म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. न २४३

परि तु कवि-रसिकांचि दिसे !

# माझीं फुलें

## ( गुच्छ १ ला )

REFBK-0003734

श्री. वा. गाडगीळ.

२१७९०८८ सं.भावि—२८

पुणें, [illegible] ग्रंथसंग्रहालयास भेट.

निजामसागर
ता. २३-२-३०
} ग. वा. गाडगीळ

काम
म. ग्रं. संग्रहालय पुणे
दा. क्र. ३७३
मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. ८०७९

मातें एकचि अर्थ येथ दिसतो– काव्यीं रमावें सदा.

# माझीं फुलें.

संकाव्य २०

## ( गुच्छ पहिला )

( श्री. वा. गाडगीळ यांच्या कांहीं कविता )

दा. क्र. ३६३५

प्रकाशक–
" महाराष्ट्र वाङ्मय मंडळ "
हैद्राबाद दक्षिण.

जानेवारी १९२८.

REFBK-0003734

किंमत १० आणे.

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. )

हें पुस्तक पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत रा. रा. **अनंत विनायक पटवर्धन** यांनी छापिलें व रा. रा. **नागोराव जीवनराव कलुरकर,** चिटणीस 'महाराष्ट्र वाङ्मय मंडळ' यांनी हैद्राबाद दक्षिण येथें प्रसिद्ध केलें.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

आमचे कविमित्र श्री. श्री. वा. गाडगीळ यांच्या काव्यलतेवर उमलणाऱ्या फुलांतील कांहीं फुलें निवडून, आमच्या महाराष्ट्र वाङ्मय-मंडळातर्फे महाराष्ट्ररसिक-वृंदांस " माझीं फुलें " या नांवाच्या गुच्छरूपानें सादर करितांना मला प्रेमाचें भरतें येणें व मोदातिरेकानें माझें हृदय उचंबळून येणें साहजिक आहे. याचें कारण म्हणजे, आमच्या या निजाम राज्यांतील महाराष्ट्रांत शारदेचे सक्रिय उपासक हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत, हें तर खरेंच आहे, परंतु, मुख्य गोष्ट ही कीं, आमच्या मंडळातर्फे प्रसिद्ध होणारें हें पहिलेंच पुस्तक आहे !

विखुरलेल्या अवस्थेंत या सुमनांचा सुगंध रसिकांनीं निरनिराळ्या प्रसंगीं आनंदानें सेवन केलेला आहे. तींच फुलें टिपून व नवीनही कांहीं त्यांच्या भरतीस घालून आज हा गुच्छ काव्यप्रेमी रसिकांच्या सेवेला सादर समर्पिला जात आहे. या ' कविगीतां ' ( Lyrics ) ची खुमारी कांहीं औरच आहे, असें त्यांना आढळून आल्याशिवाय राहणार नाहीं

स्वतां माळ्यानें जरी विनयानें आपल्या काव्यकुसुमांस " सदाफुलीचीं फुलें " म्हटलें आहे, तरी आपल्या गुणरूपाच्या बलावर व नवरसपरिपूर्ततेमुळें हा काव्यगुच्छ सर्वांना प्रिय होईल, अशी मला पूर्ण खात्री आहे. कारण, त्यांत प्राकृतांपासून तत्त्वज्ञांपर्यंत व सानांपासून थोरापर्यंत सर्वांच्या आवडीची सोय सहजासहजींच झालेली आहे. एखादा विनोदपंडित " बापूंच्या खाणावळींत " जेवून तृप्त होईल, तर एखादा अध्यात्म-प्रेमी " कर्मफल, " " संन्यास व मोक्ष, " " एका उन्मनस्काचे उद्गार ! " वगैरे कविता वाचून संतोष पावेल. एखादा सात्विक शृंगार-मधुपास " प्रेमगीत " " प्रियेस--, " " स्वतांला पहा

तरी दर्पणीं !" "चंद्र-कान्ता" वगैरे कविता वाचून आनंद होईल, तर एखादा वीररसभोक्ता "शिवबांचे मावळे" ही कविता वाचून कौतुकानें डोलेल. नैराश्यमय जीवितास कंटाळलेला एखादा प्राणी "हळहळणाऱ्या दुःखितास" केलेल्या बोधापासून फायदा घेईल, तर एखादा देशभक्त "दुर्दैवी हिंदभू"ची दीनावस्था लक्ष्यांत घेऊन तिच्या उद्धारार्थ पुढें सरसावेल.

सारांश, विविध रंगांच्या सजावटीनें खुललेल्या व विविध तऱ्हेच्या भावनासौरभांनीं दरवळणाऱ्या या गुच्छाचा स्वीकार महाराष्ट्र रसिक आनंदानें करितील, अशी मला पूर्ण आशा आहे. व त्याच आशेच्या जोरावर कविमित्राप्रमाणेंच माझीही रसिकांस सविनय अशी विनंति आहे कीं, हीं कोमल व आनंददायी फुलें आपण सदैव हृदयाशीं जरी न बाळगिलीं तरी, "कुस्करूं नका हीं सुमनें!"

कविमित्राची इच्छा हा काव्यसंग्रह इतक्या लवकर पुढें आणण्याची नव्हती. परंतु, केवळ माझ्या प्रेमाग्रहास मान देऊनच त्यांनीं हा गुच्छ प्रसिद्ध करण्याची परवानगी दिली व आमच्या मंडळातर्फे मला अधिकच स्नेहबद्ध करून टाकलें. मंडळाकडून सेवा घडवून मंडळाचें व गाड्याबरोबर नळ्याची यात्रा, या न्यायानें, मी मंडळाचा चिटणीस म्हणून पर्यायानें माझें नांव पुढें आणण्याचें सर्व श्रेय त्यांच्या या उदार सौजन्यांतच सांठविलेलें आहे.

तसेंच, या कामीं माझे परमप्रिय मित्र व मंडळाच्या "उल्हास" नांवाच्या हस्तलिखित मासिकाचे संपादक कविबंधु श्री. ग. वा. गाडगीळ यांचें व श्री. ह. श्री. घारे, वाङ्मयविशारद यांचें अतीव साहाय्य झालें आहे. किंबहुना, त्यांच्या साहाय्याभावीं हें काम मजकडून इतक्या समाधानकारक रीतीनें पार पडलें असतें कीं नाहीं, याची वानवाच आहे शिवाय, उभयतां गाडगीळबंधूंचा व माझा स्नेह अभंग असून, ही प्रेमज्योत हृदयांत अखंड तेवणारी आहे.

असो. मध्यंतरीं आमच्याकडून झालेल्या थोड्याशा धांदरटपणामुळें उद्भवलेला गैरसमज मनावर मुळींच न घेता, छपाईचें काम सुंदर व झटपट करून दिल्याबद्दल श्री. अ. वि. पटवर्धन यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. शेवटीं, या मंडळाकडून वाङ्मयसेवा वरचेवर होत जावो, असें चिन्तून हे "दोन शब्द" संपवितों. कारण, श्री. श्री. वा. गाडगीळ यांच्या आणखी सुमारें १७५ कविता आहेत व मंडळाच्या सभासदांत इतर कवि, विनोदी लेखक इ. आहेत. व हें सर्व लिखाण वेळोवेळीं प्रसिद्ध करण्याचा आमचा मानसही आहे.

**"सत्य संकल्पाचा दाता भगवान् । सर्व करी पूर्ण मनोरथ."**

महाराष्ट्रवाङ्मयमंडळ
गौळीगुडा, हैद्राबाद दक्षिण,
मकरसंक्रमण, शके १८४९

सर्वांचा कृपाकांक्षी,
**नागोराव कल्लुरकर.**
चिटणीस.

# फुलें वाहण्या पूर्वी—

" जरि वास
नसे तिळ थांस,
तरी तुम्हांस
अर्पिलीं सुमनें। कुस्करूं नका हीं सुमनें। "

तांबे.

रसिक व काव्यप्रेमी सुजनांस रुचेल अशा आशेनें प्रेरित होऊन, मीं माझ्या काव्यलतेवर फुललेल्या फुलांतील कांहीं निवडक फुलें एकत्रित करून प्रस्तुत काव्यगुच्छ गुंफिला आहे. व हीं " माझीं फुलें " त्यांना जर आवडलीं, तर पुढें, माझ्या काव्यलतेवर फुललेल्या सर्व सुमांचा संग्रह करून तो मोठ्या पुस्तकाच्या रूपानें प्रसिद्ध करण्याचा माझा मानस आहे.

महाराष्ट्रीय रसिक सुजनांनीं तर तऱ्हेतऱ्हेचीं सुंदर व सुवासिक काव्यकुसुमें हुंगिलेलीं आहेत. पण देवाच्या राज्यात जाईजुई जशा फुलत असतात, तद्वतच इतर सुमलताही फुलत असतात, व भक्तीनें प्रेरित होऊन धोतऱ्याचें अगर सदाफुलीचें फूल जरी देवास वाहिलें तरी जसें त्याच्या दरबारांत त्या अल्प सेवेचेंही चीज होतें, तद्वतच महाराष्ट्रीय रसिकजनस्वरूपी जनार्दनानें ही माझी अल्पसेवा स्वीकारून तिला सार्थकीं लावावें, अशी त्याच्या पदीं माझी नम्र विनंति आहे.

हैद्राबाद दक्षिण
मकर संक्रमण, शके १८४९ } श्रीकृष्ण वामन गाडगीळ.

# अनुक्रमणिका.


| कवितेचें नांव. | पृष्ठ |
|---|---|
| १ रुष्ट काव्यसुंदरीस– ... | १ |
| २ निराश झालेल्या नूतन कवीस– | ३ |
| ३ कर्मफल. ... .. | ४ |
| ४ गृहविरह! ... ... | ६ |
| ५ प्रभुपदीं– ... ... | ७ |
| ६ सन्यास व मोक्ष. .. | ८ |
| ७ प्रेमगीत! ... ... | ९ |
| ८ निराशेंतील आशा. ... | १० |
| ९ आमची इच्छा ... ... | ११ |
| १० एकच चूक! ... ... | १२ |
| ११ कीर्तिवनिता. ... ... | १३ |
| १२ निर्वाणीची हांक! ... | १५ |
| १३ जीवाची तरफड! ... | १९ |
| १४ चुकल्या तरुणास– ... | २० |
| १५ माझें बालपण. ... ... | २१ |
| १६ उपदेशाचें औषध. ... | २३ |
| १७ प्रियेस– ... ... | २४ |
| १८ एका उन्मनस्काचे उद्गार! | २५ |
| १९ व्यर्थ कां तुम्ही हीं श्रमतां! | २६ |
| २० हृदयाचा पांवा! ... | २७ |
| २१ पहांटे निजणाऱ्या मुलांस– | २९ |
| २२ हळहळणाऱ्या दुःखितास– | ३१ |
| २३ गतगोष्टी. ... ... | ३४ |
| २४ व्यायाम. ... ... | ३५ |
| २५ "स्वतांला पहा तरी दर्पणीं!" | ३६ |
| २६ जुलमी जीवास जबाब. | ३७ |
| २७ गगन–बोध. ... ... | ३९ |
| २८ प्रभु–सपर्या. ... ... | ३९ |
| २९ सदाफूल ... ... | ४० |
| ३० एकाकी निर्झरिणी .. | ४२ |
| ३१ चंद्रकांता ... ... | ४३ |
| ३२ कमलकेलि ... ... | ४५ |
| ३३ हरिस्तवनाष्टक. ... ... | ४७ |
| ३४ नाम–महिमा. ... ... | ४९ |
| ३५ सुविचार. ... ... | ४९ |
| ३६ उन्मनस्कालाप. ... ... | ५० |
| ३७ मोदेषणा. ... ... | ५१ |
| ३८ आहे सर्व खरें, परंतु– ... | ५२ |
| ३९ बापूची खानावळ. ... | ५३ |
| ४० वर्षाकाल. .. ... | ५६ |
| ४१ बालपण. ... ... | ५७ |
| ४२ शिवबांचे मावळे. ... | ५८ |
| ४३ गुणी बाळ. ... ... | ६० |
| ४४ लाजाळूस– ... ... | ६१ |
| ४५ प्राक्तनास– ... ... | ६२ |
| ४६ भवार्णव. ... ... | ६३ |
| ४७ कवीचें स्तोम कां! ... | ६३ |
| ४८ दुर्दैवी हिंदू! ... ... | ६४ |
| ४९ मर्मकथन. .. ... | ६६ |
| ५० कवि. ... ... | ६७ |
| ५१ विरहगीत! ... ... | ६८ |

# शुद्धिपत्र.

( यांत किरकोळ चुकाचा विचार केलेला नाहीं. )

४ थ्या पानावरील ४ थ्या ओळीबद्दल खालील पाठ घ्यावा:—

दिव्य द्युति मग येइल तूतें होउनिया तव दिव्य मति

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | ९ | जड दृष्टीतें | जड दृष्टितें |
| ४ | १४ | तुजसम दृष्टी | दृष्टी तुजसम |
| ५ | १४ | घडे | घडें |
| २१ | ९ | थाव | थाव |
| २६ | १९ | आता | आता |
| २९ | १६ | सोडुनी | सोडुनि |
| ५२ | १ | क्रात | क्रांत |
| ५३ | ३ | साख्यविलास० | सौख्यविलास० |
| ५४ | १३ | पाट | पाट |
| ५७ | २ | गुरा वासुरा | गुरा वासुरां |
| ५८ | १ | भरतस जव्हा | भरतसें जेव्हां |
| ५९ | १ | प्राशुना | प्राशुनी |
| ६० | १३ | सौंदर्य | सौंदर्य |
| ६३ | | ता. १९।२।२।२५ | ता. १९।२।२५ |

काव्य नं. ८०८
ना.

# समर्पण.

सदाफुलाच्या सम काव्य माझें;
सुगंध ना त्या, फुलण्यास लाजें !
ईशा ! तरी त्वत्पदिं वाहताहें;
तेणें तया सार्थक लाभताहे !

# माझीं फुलें.

## गुच्छ पहिला.

### रुष्ट काव्यसुंदरीस—

( एकदां बरेच दिवस होऊनही कांहींच काव्य सुचलें नाहीं, त्या प्रसंगीं प्रस्तुत कविता लिहिली गेली. )

( चालः—चंद्रकांत राजाची कन्या. )

रुसलिस कां तूं कवितेबाले, सांग मशीं सखये
कां न बोलशी? कां न हांसशी? कोप मनीं कां ये?
अति सलगीनें काय तुझ्या मीं दुःख दिलें हृदया?
असेल ऐसें तरिही सखये, क्षमस्व दीना या!
शरण मी तुला, जाण देवते, स्वीकारीं मजला
मी अपराधी पदर पसरुनि विनवीं गे तुजला!
अवकृपेनें तुझ्या भासतें विश्व शून्य मजशीं;
तिमिर वावरे हृदयीं सांप्रत, काय कथूं तुजशीं!
स्फूर्तीची मम वीणा झाली मूक गडे हाय;
तारा गंजुनि गेल्या साऱ्या, गान मुळिं न होय!
दिव्य दृष्टी, तुझ्या प्रसादें होती जी मजला
कोठें गेली, मी न जाणतों रम्य भास नुरला!
दिव्य गान मज ऐकूं ये ना; कांहिं न दिव्य दिसें;
नभिं वावरणें अशक्य होई, स्वर्ग दूर भासे!
तुझ्या सवें त्या तारा रुसल्या, चंद्र, तसा वात,
आकाशींचा सूर्यहि रुसला तो पंकजमित्र!

वृक्षलता त्या, निर्झर सारे, गिरिशिखरें तीं हीं
सागर रुसले, नद्या तशा त्या, संध्या, रजनी ही!
सृष्टी रुसली, देवहि कोपे, मज्जीवन मजला
तेणें व्यर्थचि मी, म्हणुनी मी पामर याचिं तुला!
ऐकवील मज कोण गान तें स्वर्गीचें दिव्य?
उडुपति निजपरिवारासह तो लिहविल कधिं काव्य?
पक्षी मजला शिकवितील कधिं नभांत उडण्यास;
वृक्षलतांचा विनोद केव्हां मिळेल बघण्यास?
निर्झर-रव तो-मधुर गान तें-श्रवणीं कधिं येई?
वीचि जलधि तो फेंकुनि मातें बोध कधीं देई?[1]

\+ + + + + +

नव तरुणींच्या हृदया मधल्या मुग्ध प्रणयाची
बावरलेली खळबळ केव्हां दिसेल मज साची?
हृदयसंपुटीं सांठविलेल्या अमित प्रीतीची
गालिं लाजरी लाल छटा ती दिसेल कधिं साची?
गोल लोल ते नयन चोरटे मृदुल, मधुर राग
नवयुवतींच्या हृदिं दडलेला कथातिल कधिं, सांग!
थरथरणाऱ्या अधरोष्ठांची छबि नाजुक लाल
प्रेमाचे मधु लेख गोमटे लिहविल कधिं, बोल!
शूर, मर्द मावळे मराठे रणामधें लढुनी
गेले, त्यांचे पोवाडे तूं लिहवी मजकडुनी!
पारतंत्र्यकर्दमीं रुतुनिया भू-माता फोडी
हंबरडे बहु; ऐकुनिया ते हृदय धैर्य सोडी!

---

१ " वीचि वारिधि पुन्हां वरि फेंकी । दिव्य बोध मजला करण्या कीं "
" नामलेसन "– का. ह. मोडक ( माधवानुज )

चल, ये कविते! करुणारव तो वर्णन करण्याला
साह्यभूत हो झडकरि मजशीं-विनंति ही तुजला!
ऋजु हृदयाचे बाल बोलती बहु बालिश बोल
हास्यरसें ते थबथबलेले- वर्णुं कसे, बोल!
मद्‌हृदयस्थितभावसिंधुवरि उसळाया लहरी
त्वद्रुचिराननपूर्णचंद्र तो उगवूं देच तरी!
कविते तव गे विसरुं कसा मी विलास बहु रम्य?
हास्य मधुर, मधु भाषण तव गे होइ न अजि गम्य!
विचारतों मी, सांग मशीं तूं, कां अपुली लीला
दावुनि, तैसें गान शिकवुनी केलें मुग्ध मला!
तुझ्या कृपेविण आतां म्हणुनी मृत्यु प्रिय वाटे,
प्रसन्न होउनि सखे, काढ गे हृदयांतिल कांटे!

इंदोर ( माळवा ) १९२० } प्रसिद्धीचें स्थळ, New Poona College Magazine.

---

## निराश झालेल्या नूतन कवीस—

( चालः– हरिची भगिनी म्हणे सुभद्रा– )

शुष्क हृदय आपुलें करिसि कां अरसिक पाहुनि जग हें रे!
भरलेलें हें व्यवहारानें, त्यांत म्हणोनी रस न उरे
का धरिसी तूं चाड जगाची हिशेब राखी सदैव तें
देणें घेणें केवळ जाणें, दुसरें कांहिं न त्या दिसतें!
अशाश्वतेमधिं गढून गेलें, शाश्वत सुख त्यातें न कळें
स्वार्थामागें वेंचुनि सगळें, सदा सर्वदा धांवपळें.
वेडा तुजला म्हणेल जरि जग, बरळूं दे त्या हवें तसें
अशा जगाची कशास पर्वा, दिव्य मंत्र हा सांगतसें!

सृष्टीपासुनि दूर अती हें, न दिसे लीला तिची तया
सृष्टीमध्यें विलीन हो तूं, कशास बाधे मग माया !
हृद्यकोंदणीं स्थाप कल्पना भव्य उज्ज्वला हिरकणि ती
दिव्य दृष्टि मग मिळेल तूतें येइल ही तुज दिव्य द्युति
रसज्ञ बनुनी निसर्गासवें खेळण्यांत तूं खेळ सदा
देहभानही यदा विसरशिल मिळेल परमानंद तदा
मधुर गान तुज निसर्ग शिकविल गा रे तूं मग मुक्तरवें
अरसिक जगही भजेल तुज मग थोर मानुनी खचित कवे !
जड दृष्टीतें असें अगोचर पाहुनि तें अपुल्या नयनीं
कथशिल जधिं तूं कवितारूपें जग होइल रे चकित मनीं
निज काव्यानें ऐकविसि यदा दिव्य सुधामय तें गान
जड जग तुज जें हंसलें आधीं त्याही राहिल ना भान !
जन न जाणती तुला सांगतों, महत्त्व हेंची खरें असें
गूढ गान तव काय कळे त्यां, तुजसम दृष्टी ज्यांस नसे !
कवे ! म्हणोनी नको निराशा, वनांत जाउनि गा गाणें
वृक्षलता त्या, निर्झर, वायुहि ऐकतील तें एकमनें !
तुझ्या सवें मी वनांत येतों, निसर्गसत्ता असे जिथें
जलसे उडवूं काव्यरसाचे देहभान विसरूनि तिथें !

इंदोर ( माळवा ) }
डिसेंबर १९२०. }

प्रसिद्धीचें स्थळ—
New Poona College Magazine.

---

## कर्मफल.

( कामदावृत्त. )

एक दुर्गुणी, एक सद्गुणी,
एक रंक ही, एक तो धनी !

कां असें जगीं आढळें बरें ?
पूर्व जन्मिंचें कर्म हें खरें !
एक बुद्धिवान्, मूढ ही दुजा,
एक उंचही, एक तो खुजा
कां असें जगीं सांपडें बरें ?
पूर्वजन्मिंचें कर्म हें खरें !
एक कृष्णही, एक गौरही,
एक तामसी, एक शांतही
ही विचित्रता आढळे कशी ?
पूर्विंची कृती राहते जशी !
एक सोसतो आपदा सदा,
एक भोगतो सौख्य सर्वदा !
कां जगीं असा भेद सांपडे ?
पूर्ववर्तनें जाण हें घडे !
अल्पकाळची एक राहतो,
दीर्घ आयु तें एक भोगतो,
कां असा जगीं भेद आढळे ?
पूर्व कर्म हें ! काय ना कळें ?
एक तो सदा पुत्र इच्छितो,
बालसैन्यची एक पाळतो
भेद कां असा देव ठेवि हा ?
देव ना, परी दैव राखि हा !
दावितें अम्हां आमुची कृती
या जगीं बरी वा बुरी स्थिती
यामुळें तुम्हां सांगतों पहा,
सत्कृतीमधें गुंगुनी रहा !

इंदोर ( माळवा )
१९२०.

# गृहविरह !

( शार्दूलविक्रीडित )

माता प्रेमळ, तो पिताहि, सुभगा पत्नी जिथें राहते
तैसे बंधु लहान, त्या भगिनिही, मद्गेह तें खेळतें—
माझ्या मानसअंगणीं; विसरतों देहासही मी तदा
वाटे मन्मनिं सर्व सोडुनि अशा गेहीं वसावें सदा !
मायेचे मधुबोल ते जननिचे कैसा भुलूं मी शकें ?
ताता आठवतां मुळीं मम मनीं धीरत्व ना तें टिकें !
प्रेमाची पुतळी, सुहास्यवदना माझी सुशीला प्रिया
येतां मानस—मंदिरीं सकल ही मद्भान जातें लया !
भावंडें मज आपुल्या सुखवितीं त्या निर्मल प्रीतिनें
सांगा हें विसरूं कसें ? बनतसें मी खिन्न याकारणें !
गेहाच्या विरहें तनू तपतसें, वाटें, कधीं जाइन—
माझ्या गेहिं, सुखार्थ जें दिसतसें मोठें मला साधन !
कर्तव्याकरितां गृहासि मुकुनी आलों जधीं दूर मी,
कां पावेल न वर्धता बहुतची प्रीती कथा हो तुम्हीं !
प्रीतीचें विरहेंच वर्धन घडें; तेणें कळे योग्यता—
गेहाची, जगिं ज्या मुळींहि तुलना ना आढळे तत्त्वतां !

इंदोर[1] ( माळवा )
१९२०.

---

१ तेव्हां कवी Christian College Indore मध्यें शिकत होता.

# प्रभुपदीं—

काव्य ८०८

( पृथ्वीवृत्त )

अनंत अपराध मी करितसें; क्षमा तूं करीं!
कृपाकर विभो! असें बहुत हिंपुटी अंतरीं
तुझ्याविण मला नसे गति दुजी; तुझें लेंकरूं—
खरेंच बघ मी, कृपेविण तुझ्या कसें रे करूं!
अरे, बघ तरी कसे छळिति हे मला षड्रिपु!
किती दुखविती सदा मम अमोलशी ही वपु
विमोह मज दाउनी चुकविती भवीं सत्पथ,
असे असति षड्रिपु— प्रबल त्यामधें मन्मथ!
मला अति अमोल ही नरवपू असे लाभली;
भला द्विज, तसाचि सत्कुलज, संसृती पाहिली—
अती भयद, कीं मुमुक्षु बनलों, तरी वासना
मला कवळिती! तुझ्याविण अहा, जगीं यातना!
प्रभो, मज सदा तुझ्या मधुर चिंतनीं, तेंवि तें
तुझ्याच गुणगायनीं सुख अपारसें वाटतें!
हरे! कठिण संकटीं असिसि तू मला आसरा
समीप मज घे, जशी सदय धेनु घे वासरा!
कुशब्द जनिं ऐकण्या मजसि शक्ति दे सर्वदा
खरेंच, जड वायुच्या लहरि दुःख देती कदा!
विमूढ परि मी, मशीं म्हणुनि कष्ट होती उगा,
जधीं परिसतों कुशब्द बघ एकही मी अगा!
जगांत भरली दिसे अमित लोल ती चित्रता,
सुसगति परी मला सतत लाभुं दे तत्त्वतां

तुला विनविणें असें मम पहा रमा-नायका !
अगा, प्रभुवरा ! तुला मुळिं न आयकूं येत का.

गुलबर्गा, १९२१. | प्रसिद्धीचें स्थळ— New Poona College Magazine.

## संन्यास व मोक्ष.

( आमचे येथें एक सुखलोलुप संन्यासी आले होते, त्यांना पाहून प्रस्तुत कविता सुचली. )

( दिंडी )

शिखासूत्रांचा त्याग फुकाचाच,
जरी त्रासवि तो व्याप कीं उगाच !
वासनांचा संन्यास खरा आहे,
बाह्य वेशातें काय मान आहे !
मनीं इच्छा घालती धुमाकूळ
अशा संन्यासा काय असें मोल !
बका ऐसा हा ढोंग माजवीतो
अज्ञ लोकांतें वृथा भ्रांतवीतो !
जनांपेक्षां पैं तोचि फसुनि जाई
मुक्ति—मार्गीं मूढ हा भ्रष्ट होई
स्वार्थ, तैसा परमार्थ त्या न साधे
एक पुरुषार्थ हि बापुड्या न लाधे !
कशाला कीं संन्यास पाहिजे तो,
प्रपंचीं ही राहुनी मोक्ष होतो.

नका ठेवूं बद्धता संसृतींत
अहंता ही तैशीच ती कृतींत.
सुखीं, दुःखीं सारखी दृष्टि राहो
तसें द्वंद्वाच्या अतित तुम्ही व्हा हो.
सुखें भौतिक जगतांत नेष्ट जाणा
सदा अध्यात्म ज्ञान मनीं आणा !
धरा धर्माची कास तुम्हीं नित्य
जगीं धर्माचें बीज होय, सत्य.
अधर्माचा मानसीं नको लेश,
अधर्मानें होतात अति क्लेश !
सदा देवाचें स्मरण तुम्हां राहो
करी तुमचें मांगल्य पहा तो हो
अशा रीतिनें मनुज किती शोभे
तया येणेंची मोक्ष खरा लभे !

रायचूर, }
१९२१. }

---

## प्रेमगीत !

कधीं रुसूं,
कधीं हंसूं
प्रेमगीतही गात बसूं !
परस्परांच्या प्रेमांत । कंठूं आपण दिन रात ! ॥ १
कधिं विपिनीं,
कधिं सदनीं
अवनी मध्यें संचरुनी
बोलूं प्रेमाच्या गोष्टी । मोदवुं सारी ही सृष्टि ॥ २ ॥

सुख जैसें,
दुःख तसें !
मानुनि दोघांतें समसें
द्वंद्वाचा त्या नाश करूं । चिरशांतीतें मनीं धरूं ॥ ३ ॥

सदा वसूं,
बरें दिसू—
प्रेम—गृहिं, अन्यत्र नसूं !
विलीन होऊं परस्परीं । या सम अन्या नसे सरी ॥ ४ ॥

वागुं कसें ?
एक जसे !
संसृतिची तधि भीति नसे !
भवाब्धिच्या मग पैलतिरीं । नेइल आम्हां तोचि हरी ! ॥ ५ ॥

रायचूर,
मे १९२१.

प्रसिद्धीचें स्थळ—
New Poona College Magazine
व
काव्यरत्नावली.

---

## निराशेंतील आशा

( एका दुर्दैवी स्त्रीच्या मनोभावना प्रस्तुत कवितेंत चित्रित केल्या आहेत. )

"Of all the sad words of pen and tongue
The saddest are these—It might have been"
Dryden

( चालः— राजहंस माझा निजला. )

ते भले भले वायूचे । गड सारे वितळुनि गेले ॥ ध्रु. ॥
ते मनिंचे मांडे बसले । मानसींच; मेली आशा
संकल्प जळाले सारे । ते बेत पावले नाशा !
मागील भविष्यचि चुकलें । धरुं कवण्या आशा-पाशा !

सं. काव्य ७०८



दुर्दैव फळा मम आलें
मद्धैर्य हिरावुनि नेलें
दौर्बल्य मानसीं आलें
अजि काय हाय, हें झालें। गड सारे वितळुनि गेले ॥ १ ॥
जें विधिनें भालीं लिहिलें। सांगावें, कैसें टळतें
देवावरि यास्तव भार। घालुनी अतां मी बसतें
दावील दिवस सोन्याचे। कष्टेंच थोरपण येतें
प्रभु चालक या विश्वाचा !
थांग ना अम्हां शक्तीचा !
तो अती दयाळू साचा !
अजि खरें अकारण भ्यालें। जरि सारे वितळुनि गेले ॥ २ ॥

रायचूर, }
१९२१. }

---

## आमची इच्छा.

( दिंडी )

बोल बोलुनियां सत्य, मधु, स्निग्ध
करूं लोकांतें जगीं सदा मुग्ध !
मधुर काव्याची घालुं मोहनी ती
जगीं संपादूं बहुत जन प्रीती !
ऋजुत्वाचा स्वीकार करुनि लोका
बहू तोषवुं; वाढवूं प्रेम, देखा !
दो दिसांच्या संसृतीं सदा हांसूं
जनांसाठीं अत्यंत झीज सोसूं !

स्वर्गलोकीं जेथवां अम्हीं जाऊं
तीक्ष्ण चटका लोकांस अती लाऊं !
लोकसंग्रहची गोड वागण्यानें
करूं आम्हीं अत्यंत समाधानें
नको केव्हांही हिडिस अम्हां गर्व;
हवा आम्हांतें विनय, जया सर्व-
पराकाष्ठेनें इच्छिती सुलोक !
अहा, आहे तो दुरभिमान ओक !

पुणें
१९२१.

---

## एकच चूक !

( विद्युन्माला वृत्ताचे चालीवर )
" एकच पेला ! " होय पुरेसा
सत्पंथातें मुकण्या सत्वर
" गोविंदाग्रज " होउनि गेला
सांगाया हें तत्त्व मनोहर !
एक चूक हो होय पुरेशी
शीलच्युति होण्याला जगतीं
एकचि धक्का होय पुरेसा
चक्राला हो मिळण्या गति ती !
एक मद्याचें जरी लागतें
चोट तरीही मोह नावरे
दुष्कर्मांची चटक एकदां
जधीं लागते; मुळिं न आवरे.

पुन्हपुन्हां तो दुर्मार्गाला
जाइ मनुज, जो आधिंच चुकला
खऱ्या सुखातें अहा, सततचा
नि:संशयची मुकला मुकला !
चुके एकदां मनुज जगीं जो,
दुष्कर्मीं तो बहुधां फसतो.
बुडल्याचा तो पाय खोलची
जाई; तो हो क्वचितचि तरतो !
मनुजें यास्तव सावध राहुनि
टाळावें मोहातें जगती.
मोहचि घाली संकटिं, म्हणुनी
त्यास निवारुनि भोगा सुख अति !

पुणें
२०।११।२१.

## कीर्तिवनिता.

"Fame like a wayward girl, will still be coy
To those who woo her with too slavish knees,
But makes surrender to some thoughtless boy
And dotes the more upon a heart at ease"

KEATS.

(शार्दूलविक्रीडित)

आहे ही लहरी जगांत ललना, अंधाहि तैशी अती;
केव्हां घालिल माळ कीर्ति कवणा याची नसे संगती
तीतें सद्गुण केधवां न दिसती, मानी कधीं दुर्गुणां-
मोठें भूषण ! पाहिली कधिं दुजी ऐसी पिसी अंगना ?

इच्छी जो नर कीर्तिला मुळिं न त्या होई वशा ही कधीं
लोटी दूर तिला तयास परि हो आलिंगिते ही अधीं
आयुष्या सगळ्या जयीं खरचिलें लोकीं तिच्याकारणीं
राखाया तिमिरीं तयांस अगदीं खंती न मानी मनीं
आयुष्यीं सगळ्या कुणास जगतीं लाभे न, त्याला परी
मेल्यानंतर माळ घालुनि जगा नामें तयाच्या भरी
जे गेले परलोकिं त्यांस वरुनी वैधव्य घेते बळें
कीर्ती का असले खरेंच करिते चाळे सदाचे खुळे ?
मोठे, सुंदर, सद्गुणी कितितरी सोडोनि ते सज्जन
कौमार्यीं वसते कशास ? कधिं कां कीर्ती वरी दुर्जन ?
मानूं ही चवचाल कीर्तिवनिता, किंवा गणूं ही खुळी ?
आहे जीवित तोंवरी तरि विभो, घालो न माळा गळीं !
जेव्हां कीर्ति वरी जिवंतपणिं हो बव्हशिं तेव्हा पहा
आम्हा नम्र तिचाच दास बनुनी लागें रहावें अहा
अक्काबाइ असे दुरी जंवरि हीं, स्वातंत्र्य आम्हां खरें !
येवोनी परि जेधवां बिलगते, स्वातंत्र्य आम्हां नुरें
जेव्हां ही जगिं एकदां मिळतसे, तेव्हां तिच्या रक्षणीं
लागें संतत हो अम्हांस जपण्या चिंता मनीं वाहुनी
" आम्हांतें जगिं लोक काय म्हणती ? " ही एकची दृष्टि हो
द्यावा तो मग अर्धचंद्र मनिंच्या इच्छांस लागे अहो.
आयू जोंवरि हें, स्वतंत्र उरुनी गाऊं मनासारिखें
खंती बाळगुनी मुळीं न कसली लोकीं पिकासारिखें
लोकांच्या म्हणण्यास मान जगतीं द्यावा कशाला बरें ?
हो ती कीर्ति दिगंतिं, वा मुळिं न हो, " कृष्णास " पर्वा नुरे !

पुणें
११।१२।२१.

प्रसिद्धीचें स्थळ—
New Poona College Magazine.

# निर्वाणीची हांक !

( चालः– त्रिखंड हिंडुनि धुंडिलसें. )

मोहाच्या निद्रेमधुनी
ऊठ, ऊठ रे ! खडबडुनी
तारुण्याचा रवि आतां
आला बघ रे किति वरता !
हीं निद्रेची
वेळ न साची !
कर्तव्याची
रास केवढी तुझ्या पुढें !
कधीं सारिसी तिला कडे ?
पाठ दाउनी कर्तव्या
दूर लोटिसी कां भव्या ?
नैराश्यानें मूढ असें
जनण्यामध्यें चीज नसें !
धरुनि चिकाटी
करीं हकाटी
भर भर पाटी
कर्तव्याची रास तधीं
कडेस जाइल खचित सुधी !
अल्प राहिला काळ अतां
जाइल तो बघतां बघतां !
विफल सर्व होईल पुढें
नैराश्याचें गाड मढें !

योग्य समय हा,
कर्तव्य अहा !
तूं करितं रहा
फलप्राप्ति होईल तुला
ठेव भरंवसा मनीं भला !
तारुण्याचा बघ सविता
अस्ताला जाइल आतां
पावशील तधिं अनुतापा
ऊठ, ऊठ, रे ! झणिं बापा !
जगिं पडण्याचें,
चुकभुलण्याचें,
मुळीं न साचें
मानुं नये रे दुःख मनीं
ठेव सदा तूं हें ध्यानीं !
जगतीं तर खळगे सारे;
पडणें स्वाभाविकचि अरे !
सुखदुःखाच्या तंतूंचें !
वसन असें आयुष्याचें !
मानुनि समता
धरीं शांतता,
सत्पथ पुढता
नेटानें, आनंदानें
आक्रम, आक्रम जोमानें !
द्विधा वृत्तिशीं टाकुनियां
शांतमनानें तूं कार्या-
लाग अतां, खोळंबुं नको !
काळ दगाविल, विसरुं नको !

एकमनानें,
उत्साहानें,
बहु धैर्यानें
कर्तव्या तूं कर बापा,
पुढतीं पावुं नको तापा !
प्रेमळ मातापिता जसे,
चुलते, पत्नी, सुहृद तसे
आशेनें तुज विलोकिती
घेउं नको करटी हातीं !
अशी मंडळी
प्रेमळ सगळी
दैवें जुळली
सद्भूषण या आप्तांचें
ऊठ, ऊठ तूं ! बन साचें !
निष्कामप्रीतिची खनी,
सात्विकतामूर्ती, जननी !
यदीय वात्सल्याकाशीं
अपराधांच्या किति राशी
सुखें दडविशी
परि न देशी
सुख पितरांशीं
सोड, सोड असली रीती
धर कर्तव्यीं तूं प्रीती!
विशाल निधि औदार्याचे
ते पितृव्य तुझे साचे!

तुझ्या स्वरूपीं लीन सदा,
जी विश्वंसी मनोगदा
पत्नी असली
तुला लाभली.
दैवें कसली
सुखवाया तुज कुचराई
केलि न अगदीं, तूं पाहीं!
कां मग तू रे निजलेला?
हताश होउनि बसलेला?
दाव झणीं चैतन्य तुझें!
होउं नको भूतें ओझें!
नरजन्माचा
लाभच साचा
पुण्याईचा
झाला तुज, म्हणुनी आर्या!
लाग, लाग रे! तूं कार्या
कार्याचें विस्तीर्ण अती
क्षेत्र तुझ्या रे, बघ पुढतीं!
योग्य रीतिनें पारखुनी
ध्येय तुझें तूं ठरव मनीं!
त्या ध्येयातें
साधायातें
कर यत्नांतें!
जाउं नको गंजून परी;
ऊठ, ऊठ रे कार्य करीं!
पारतंत्र्यपंकीं फसली,
दीना भूमाता झाली!

हृदयद्रावक हंबरणें,
ऐक तिचें तैसें रडणें !
जा उद्धारी
तिला झडकरी
गरिब बिचारी
तुजसम पुत्रांकडे पहा
साश्रु विलोकन करी अहा !
ऋणको कवणां राहुं नको,
तर्पाया त्यां चुकूं नको !
'निर्वाणीची हांक' खरी
तुला मारितों, ऐक तरी !
ऊठ अतां रे !
मोहा त्यज रे !
जाइल सारें—
यौवन, मग तूं रडशील
शोकें वेडा बनशील !

पुणें
ता. ४।१।२२

---

## जीवाची तरफड !

(शार्दूलविक्रीडित)

माझ्या बुद्धिस कार्य लौकिक कदा गोडी न देते खरी
मोदावें करुनी अलौकिक जनीं इच्छा अशी अंतरीं !
देहांतूनि उलावयास बघते चिच्छक्ति माझ्यांतली,
जेंवी पोपट पंजरीं तरफडे मुक्ती मिळाया भली !

पुणें.
ता. ४।१।१९२२

## चुकल्या तरुणास—

(अंजनी-गीत)

चुकल्या तरुणा ये मार्गावर
फिरसी कां रे तूं भिरभीर ?
कृष्णनिशा मोहाची सरली,
जाउं नको दूर ! १

सुविचारार्कप्रभा फांकली
जरा बघ तरी, पटलें सरलीं !
कथितो तुजशीं ' कृष्ण ' कवी हा
पिक-कूजन ऐक २

प्रभात आतां उगवे सुंदर
ध्येयाचें तव दिसेल मंदिर
धर तूं थोडा धीर मनीं रे
होउं नको वेडा ! ३

नकोच नैराश्यें वैतागूं
किती, कसें मी तुजसी सांगूं !
अरे, तिथेंची थांब जरासा
भ्रमूं नको दूर ! ४

जाशि कशाला मूढा तिकडे ?
कितिक फसले तिथें बापुडे !
इकडे आतां फिर तूं मागें
अधःपतन सार ! ५

व्यूहामध्यें जरी एकदां
गुंतुनि जाशिल, तुला मग तदा
राजमार्ग तो उन्नतिचा रे
नाहीं मिळणार. ६

खोल भयंकर तिकडे गता !
याचि नसे का तुजसी वार्ता ?
तयीं स्वतांतें लोटुनि देशी
मी तुज काय म्हणूं !
थांब जरा हा सुटेल गुंता
विचार-रवि बघ आला वरता
अल्पकाळ तूं शांत रहा रे,
थोडी कळ सोस !

3737

पुणें,
ता. ७।१।२२

## माझें बालपण

( शार्दूलविक्रीडित )

होतों जोंवरि सान हो बहुतची क्रीडा सुरम्या अहा-
केली मीं; ममकार-राक्षस तधीं अज्ञात होता पहा !
सारल्यीं बहु रंगुनी अमित मीं आनंदची भोगिला,
तैसा मीं इतरांसही कितितरी चाखावया अर्पिला.
येई झोंप जधीं सुखें पहुडलों अंकावरी आइच्या
लागे भूक तधीं मदीय मुख मी लावीं स्तनासी तिच्या
केव्हा मी रडलों, तसेंच हंसलों, बोला किती बोललों-
भारी मंजुळ बोबड्या; कितिकदां हर्षामुळें नाचलों
चिंता माहित ती मुळींच नव्हती बाल्यीं मला केधवां
हर्षाचा तधिं एक भावाचि अहो घाली मनीं तांडवा
मातृब्रह्म—विलीन होउनि तधीं आनंद मी पावलों
गेलें शैशव गोड तें म्हणुनि मी अत्यंत पस्तावलों !

जें जें आयकिलें निरंतर तया बोलावया मी झटें
माझें ऐकुनि बोबडे वच तधीं प्रेमा कुणाही फुटे !
जें केलें इतरीं तयास करण्या इच्छीं जधीं अंतरीं—
वर्णाया असल्या नितांत—मधुरा बाल्या थके वैखरी !
काळे काक, तशा लहान चिमण्या पाहून आनंदलों
काष्ठाच्या मृत बाहुल्यांसहचि हो, प्रेमें बहू खेळलों
काकांच्या सम रुक्ष काढुनि रवा आनंदवीलें जना
बाल्याचें असल्या जधीं स्मरण ये, होती मना यातना !
वेडें कांहिं विचारुनी गुरुजनां अत्यंत भांबाविलें
घेण्यातें टिकल्या—नभीं लटकल्या त्या चांदण्या—इच्छिलें
झाडाआड जधीं शशांक दडला प्रेमें तया बोललों,
" चांदोबा, थकलास का ! " वदुनि त्या मी मन्मनीं मोदलों
रेखा रेखुनि वक्र त्यांस सकलां वाचावया प्रार्थिलें,
केव्हां गंभिर होउनीहि लटिकें मीं पुस्तका वाचिलें !
चाळे मीं असले खुळे किति तरी केले सुखें जेधवां
गेलें शैशव हाय ! आज, पुढतीं येणार का केधवां !
तेव्हां थोरपणींच सौख्य गमलें, तेंही अतां लाभलें,
आलें सर्व परंतु आज कळुनी, चिंतानलीं मी जळें !
" आहे डोंगर दूर तोंवरिच तो शोभे, " पटें तत्त्वतां
काव्यीं शैशव आठवोनि रमणें हेंची उरें हो अतां !

पुणें, }
ता. १४।१।२२ }

प्रसिद्धीचें स्थळ-शालापत्रक
पुणें

# उपदेशाचें औषध

( गीति )

सतत मत्सौख्यातें गुरुजन जे इच्छिती तयांनाच
वाक्शल्यें हाय, अहो मूढपणें दुखविलें अती साच !
शांतपणें, भव्येच्छें प्रेरित होवोनि, कळकळीनें ते
हितवच हळुं हळुं मातें सलगीनें तेधवां कथित होते.
तोंच अकल्पित झाला मत्कटुवचअशनिपात त्यांवरती
झालें हृदय तयांचें भग्न तधीं ! मी असें किती कुमती !
नेत्र बहू डबडबले, गद्‌गदुनी बोलते तधीं झाले,
"उपदेशणें तुम्हा मी, माझें कर्तव्य, त्यास मीं केलें,
धिक्कारा, अथवा त्या माना—वाटेल तें करा तुम्ही!
तुमच्या कल्याणास्तव सांगितलें हें तुम्हास हो आम्ही!"
होते खरेच हितकर बोल तयांचे, परी मला तेव्हां
पटले न ते मुळींही, क्रोधोन्मत्ता बरें कळें केव्हां !
उपड्या घड्यावरी जल आहे टिकणार कोणत्या काळीं !
हितवचसुधा म्हणोनी उपड्या बुद्धिवरोनि ती सरली !
परि आतां मन्मानस पश्चात्तापें अतीव कीं जळतें
सुख पळतें, हुरहुरतें, हितवच त्यांचें क्षणोक्षणीं स्मरतें !
औषध शरीररोगा उपयोगी जेंवि होय परिणामीं
आमयपूर्ण मनातें उपदेश कटू तसाचि हो नामी !
हें तत्त्व पुरें कळलें; विसरायाचा कधीं न मी याला,
कटु परि हितवचनातें मानावें, सांगतों अतां सकलां.

पुणें,
ता. १४।१।२२

# प्रियेस—

चालः—( चंद्रकांत राजाची कन्या )

तुझें भाबडें प्रेम मला गे ! वेडावुनि टाकी
तुझ्या ऋजुत्वा उपमा मजला दिसे न या लोकीं
नवनीतासम तुझें मृदुल हृद् स्नेहभरित भारी
प्रीतिजलीं मीं प्रिये, प्रेमले, संतत केलि करीं
नेत्र तुझे बहु सतेज, जणु ते गगनींचे तारे
तयांपुढें निस्तेज भासती हीरक ते सारे
कंटकमय संसारपथीं तू माझी प्रियकरिणी
तव सहवासीं काव्यलता गे फुलते मधुसुमनीं
उणा होतसे दुःखभार गे तुझिया सहवासीं
सौख्य दुणावें; धैर्य येतसें भवनद तरण्यासी
तुझिया सन्निध अर्थ, काम गे मिळविन सद्धर्में
अन्योन्यप्रीतीनें सारूं संसृतिचीं कर्में
तुझिया योगें सत्पंथीं मी वावरतों आर्ये
विकल्प सारे नाश पावती तुझ्यामुळें भार्ये
प्राणाहुनि तूं प्रियतर असशीं भाजन मोदाचें
सहवासाचें प्रिये लाभुं दे सौख्य सदा साचें !

पुणें, ता. १५।१।२२ } प्रसिद्धीचें स्थळ काव्यरत्नावली.

# एका उन्मनस्काचे उद्गार !

( शार्दूलविक्रीडित )

माझी दृष्टि नसे जडांत खिळली, आत्मस्वरूपांत मी
गेलों संततचा शिरोनि, मजला कांहीं नसें हो कमी
मातें बंधन वाटतें न कसलें हा खेळ वाटे मला
लाभालाभ तसा जयापजय मी गुंडाळुनी ठेविला
जें जें होइल तें उगाच्च ब्रवणों आतां उरे केवळ
देहाचा कठडा गळेल मग मी व्यापीन दिङ्मंडळ
आकाशासहि भेदुनी पुढतिं मी जाईन हो तत्त्वतां
वाटे बाधक युक्तिवाद तुमचा, कां तो मला सांगतां ?
व्याजाच्या जगतात दंगुनि मला लाभेल कोठें सुख ?
तुम्हीं कां मग दावितां मजसि हो खोटें जगाचें सुख ?
माझा स्वैर विहार विश्व सगळें व्यापून हो टाकतो
ब्रम्हानंदसुधा निरंतराचि मी जाणा इथें चाखतों
घेतां शोधुनि कंठ कां उगिंच हो ? गेलों अती दूर मी
आप्तांनो ! मजला उगां फिरवितां मागें कशाला तुम्ही ?
नाहीं बंध जिथें प्रदेश असला मीं आक्रमीला असे
गोलाकार चि एक येथें सगळा, कोना कुठें ही नसे
मी सर्वां विसरूनि येथ बनलों वेडा जनांनो ! अतां
येथें मी मनसोक्त गात असतों चिंता नसे तत्त्वतां
सारा एकचि येथ रंग असतो, द्वंद्वासि ठावा नसे
ब्रम्हानंदसुधेमधें वितळणें सोपें इथें फारसें !

पुणें, जानेवारी १९२२ } प्रसिद्धीचें स्थळ स्वधर्म साप्ताहिक, पुणें

## व्यर्थ कां तुम्ही हो श्रमतां !

( चालः- कुस्करू नका हीं सुमनें )

हें वेडें
लागतें गोड.!
तया कां तोड
काढितां आतां ?
व्यर्थ कां तुम्ही हो श्रमतां ? ॥ १ ॥

ही स्थिती
सौख्यदा किती !
हीच की गती
वाटते आतां !
व्यर्थ कां तुम्हीं हो श्रमतां ? ॥ २ ॥

येथला
मोद हो भला
किती, ही तुला
येत ना करितां;
व्यर्थ कां तुम्ही हो श्रमतां ? ॥ ३ ॥

हें नसें
घोर हो पिसें.
सौख्य बहु वसें
इथें, मग आतां
व्यर्थ कां तुम्ही हो श्रमतां ? ॥ ४ ॥

पुणें,
१९२२

# हृदयाचा पांवा !

( चालः– त्रिखड हिंडुनि धुंडितसें )

हृदयाचा पांवा करुनी
वाजवितों संतत भुवनीं;
विविध सुरांतें काढोनी
सौख्यातें पसरीं सुजनीं !
कधीं निघे मंजुळ सूर
शोकें कधिं ये बेसूर
कधीं शांतिचा,
कधीं प्रीतिचा,
कधिं वीर्याचा
सौम्य, मधुर, गंभीर असे
सूर पहा निघतात कसे !
धैर्याचा तो स्थीर उठे,
भीतीचा कंपित उमटे,
क्रोधानें कर्कश होई,
कौटिल्यें तो कटु येई,
आर्द्र वठे तो भक्तीचा
पांवा रमवी हृदयाचा !
बाह्य जगा तो
पाहुनि रमतो
सूर काढितो
परि जधिं अंतर्मुख होतो,
सूर न काढूं तो शकतो !

बाह्य जगा जोंवरि बघतो
कटू, गोड तोंवरि होतो,
परि अपुल्या ठायीं विरतो
कसला सूर तधीं निघतो!
निघे, परी बाहेर न ये;
इतरांतें उमजुनि ना ये!
स्वन अंतरिंचा
(सुखकर साचा!)
त्यानें ज्याचा
विसरुनि देहा, जगता ही
ऐकुनि घ्यावा लवलाहीं!
अध्यात्माचा तो वात
जधीं शिरे या पांव्यांत,
तया मूकता तधिं येई;
लीन ईश्वरीं तो होई!
कसलें ही मग भान नुरें,
मोदानें ब्रह्मांड भरें!
हृन्मुरलीचें,
या देहाचें,
सर्व जगाचें
भान हरपुनी द्वैत गळें;
जीव शिवीं अद्वैत कळें!

पुणें १९२२ } प्रसिद्धीचें स्थळ—
NEW POONA COLLEGE MAGAZINE.

# पहाटें निजणाऱ्या मुलांस—

( चाल:– त्रिखड हिंडुनि धुंडितसें– )

उठा मुलांनो ! उठा उठा
पहाट झाली, उठा उठा !
कुक्कट आतां आरवती,
धेनू हंबरुनी उठती,
पक्षी ही घरट्यांमधुनी
मोदभरें जाती उडुनी
रजनी सरली
सृष्टी सगळी
जागृत झाली
कां तुम्हीं मग निजलेले;
आळस तुमचा कां न पळे ?
प्राची कडुनी लगबगुनी
लाल उषा उगवे हंसुनी
पहा उठोनी तिला जरा
आळस जाइल मग सारा
त्याली सोडुनी चंद्रकळा
श्वेतांबर सृष्टी चाला
फुलें विकसलीं
हलूं लागलीं
शोभा आली
पहा पहा या बागेला
का हो तुम्हीं मग निजलां ?

फूलपांखरें, मधमाशा,
भुंग्या उद्योगी कैशा
उडती, चोंहिकडे फिरती.
निज कर्तव्यीं दक्ष किती !
चैतन्यानें सर्व भरें
निद्रा तुमची कां न सरे ?
शयना त्यागा
कामा लागा
जडता भंगा
उन्नति तुमची होईल
कुदशा सगळी जाईल
पुष्पें अर्पुनि लता पहा
वसुंधरा पूजिती अहा
तेंवि उठोनी तुम्हीं अता
गुरुजन वंदा; कां निजतां ?
किल किल पक्षी ओरडती
ईशाला ते आळविती
तरी उठोनी
मोहा त्यजुनी
ईश्वर-चरणीं
वंदा; प्रभुगुणगान करा
ऐका हें मद्गान जरा !
निद्रेला देऊन रजा
उठा, शारदेप्रती भजा
परि राखा आरोग्य सदा,
आरोग्या विण यश न कदा !

सुपुत्र होउनि देशाचे
द्या स्वातंत्र्य तया साचें
तुम्हां लागुनी
या मम गानीं
म्हणे विनवुनी
उठा मुलांनो ! उठा, उठा !
पहाट झाली उठा, उठा !

पुणें १९२२ } प्रसिद्धीचें स्थळ-
शालापत्रक, पुणें.

---

## हळहळणाऱ्या दुःखितास-

( चालः- अर्ध तनू वारुळीं )

"Difficulties are wings that bear the soul skyward"
Dr T. Arnold.

शांति धरी तू मनीं मानवा, संसृतिच्या सागरीं
येउं दे संकटनक्रा तरी ?
स्मरण हरिचें, स्तवनहि त्याचें संतत बघ रे करी
तुला तो पावेलचि लौकरी
संकटिं विभुतें आळवितां तो कदा न जाई दुरी
तयाची येइ न कवणा सरी
बा असे सदाचा संकटमय हा भव
मोहानें बुडती इथें किती मानव
सौख्याचा नसतो फार इथें संभव
दुर्लभ नरवपु पुण्यबलानें तुला लाभली अतां,
चीज तू करी तिचें तत्त्वतां ? ॥ १ ॥

हरिनें दिधली मुक्ति गजेंद्रा नक्रातें मर्दुनी
तुला ही मुक्त करिल तो ह्मणीं
अति कनवाळू जगत्पिता, तो वाहुनि चिन्ता मनीं
सोडवी दुःख—कर्दमांतुनी
भक्तकार्य तो करण्या तत्पर; शरण तया लागुनी
जाउनी रम तू तच्चिंतनीं ?
तू हरिमय बनुनी भोग सुखा शाश्वत
तो करील बघ रे तुझें सदाचें हित
हरि विना बरी जगिं दुजी नसे संगत
नको, नको तू विषयीं गुंतूं, हानि तिथें रे सदा
स्मरावें प्रभुच्या पावन पदां ? ॥ २ ॥
नामवज्र तें हरिचें नाशी अघपर्वत संतत
तयातें भक्ति बहुत संमत
त्यागुनि सारें झडकरि बापा ! हरी पुढें हो नत
दैव मग काय करी तें हत !
प्रभुगुणसंकीर्तनीं सदा ही मनुजा हो तू रत
नको रे होऊं भक्तिच्युत
तारील भक्तिची नौका भवसागर
गवसेल शेंवटीं श्रेयाचें मंदिर
होईल हि तुजशीं प्रभुदर्शन सुंदर
ठेव भरंवसा प्रभुपदिं संतत लाभ भला तेथचा
प्रभुगुणश्रवणिं धरी रे रुची ! ॥ ३ ॥
भालिं असें जें कवणां टळतें ? धरी तितिक्षा पुरी
निवारी अशिवातें श्रीहरी
सारे संकटजंबुक नाशी लीलेनें तो हरी
तुला ही तोषवील अंतरीं

कलधौताची म्हणुनी हृदयीं खुपसावी कां सुरी,
विषय मग बाळगिसी कां उरीं ?
किति तरी आजवरि बुडले विषयांमुळें
रमतात मनुज परि तिथेंच अजुनी खुळे
आपुलें तयातें श्रेय न अगदीं कळें
हरिगुणगानीं रमवीं मतिशीं; कशास मग ती चळे ?
तिचा तो अहंभावही गळे ! ॥ ४ ॥
संसृतिसागरिं सकटनक्रां किती बोचरे सुळे !
टोंचती तीक्ष्ण जणूं ते खिळे
मृदुल हृदय त्या मुळें होतसें; संतत तें हळहळें,
परी ती भक्ति तेथुनी गळे !
दुःख–कर्दमीं पद्म भक्तिचें रुजतें तें आगळें
तरी तू सोस दुःख रे बळें !
सुख संतत मिळतां भान न हरिचें उरें
दुःखांताचि होतें स्मरण तयाचें खरें
तें तिथेंच कळतें महत्त्व त्याचें पुरें
दुःखाग्नीनें दग्ध जीव तो पुरा पुरा होउं दे,
मोहमल सारा ही जाउ दे ॥ ५ ॥
कंटकमय जरि असे अती ही दुःखाची वल्लरी
भक्तिचा गुलाब ये तिज परी
बहु धैर्यानें निज हृदयांतरिं धारण तिज तूं करी
सफलता तदाच होइल खरी !
संतबोधजल सिंचुनि हृदयीं दुःखवल्लरी बरी
वाढवी भक्तीची मंजरी !
ही गुलाबकलिका फुलेल तुझिया मनीं
दरवळेल तीचा गंधहि तो त्रिभुवनीं
आनंद तुला मग संतत होइल मनीं

भक्तीच्या या गुलाबसुमना हरिचरणीं वाहुनी
धन्यता मिळेल तूतें जनीं ! ॥ ६ ॥

पुणें १९२२ — प्रसिद्धीचें स्थळ विविधज्ञानविस्तार

## गतगोष्टी.

( दुःखद गतगोष्टींची आठवण झाली म्हणजे ईशचिंतना शिवाय शांति लाभत नाहीं )

( चालः— वीर शिरोमणि सकळ )

गतगोष्टींचीं भुतें सततचीं मन्मानसिं नाचती
हुरहुरे जीव बापुडा अती !
वृत्ति बावरे, सुचें न काहीं; भीति, निराशा तशी
दाटली किती तरी मानसीं !
रूक्ष मशीं मज्जीवित गमतें, तिमिर वावरे हृदीं
शांतिचा लाभ अतां तो कधीं ?
विस्मरणाचीं थडगीं रचिलीं गतगोष्टींच्या वरी
तयांनीं येउं नये कीं वरी !
थडगीं फोडुनि परि तीं शिरलीं मनांत सारीं भुतें
दयाळा काय करूं सांग तें ?
नव आशांच्या लता कोमला होत्या थडग्यांवरी
पुऱ्या त्या तुटोनि गेल्या परी !
उत्साहाचे अंकुर सार धुळींत गेले अरे
मुकुंदा, काहिं न तेथें उरें !
फुलें, फळें सौख्याचीं कसलीं आतां मी चाखणें
भाग हा नाच मला पाहणें !
खाष्ट नष्ट हीं भुतें मानसीं थैमानाचि घालिती
कशीं हीं नैष्ठुर्यें हांसती !

भीषणतेच्या किंकाळ्या त्या फोडुनि वरचेवरी
भरविती अतीव धडकी उरीं !
जीव कष्टला, अती उबगला पदीं तुझ्या रंगलों
परी मी दया न तव पावलों !
दयामृताचें पान लाभुं दे हेंचि याचितों तुला
प्रभो ! तू हेंचि दान दे मला

पुणें
नोव्हेंबर १९२२
प्रसिद्धीचें स्थळ
स्वधर्म, साप्ताहिक, पुणें

---

## व्यायाम.

( काव्यकुसुमें तोडतांना हें पद्यमय गद्याचें अथवा गद्यमय पद्याचें फूलही तोडलें गेलें आहे. )

( शार्दूलविक्रीडित. )

व्यायामें रुधिरप्रवाह फिरतो देहांत चौंहींकडे
स्नायु सर्व अतीव पुष्ट बनुनी काठिन्य ये रोकडें
मज्जा-अस्थिंस ये अती बळकटी, वीर्यें स्फुरे देह हा
घर्माच्या सह घाण सर्व निघुनी ये तेज अगा महा
गात्रां सौष्ठव ये, तसेंच बळही, उत्साह खेळे मनीं
आरोग्याप्रत पावतो मनुज हो बुद्धीहि ती वाढुनी
व्यायामें चिरकाल यौवन मिळे, आयुष्यही वाढतें
लीलेनें पुरुषार्थलाभ करुनी घेण्या अम्हां साधतें
व्यायामा कवडीहि एक नलगे, इच्छा हवी मात्र ती
लागे काळहि फार त्या न जन हो; तो लीलया हो अती
आहे मर्त्य जगीं खरोखराचि हा व्यायाम संजीवन
घेतां लाभ न कां तुम्हीं मग, कथा याचें मशीं कारण.

मेदोवृद्धिवरी उपाय जन हो, व्यायाम मोठा असे
सारा मेद झडोनि अंगिं बरवें चापल्य तें येतसें
व्यायामें कृशताहि सर्व विलया जावोनि वाढे क्षुधा
व्यायामें बहु लाभ संतत घडे; होते न हानी कदा.

पुणें,
नोव्हेंबर १९२२ }

---

## "स्वतांला पहा तरी दर्पणीं !"

[ पत्नीनें दागिने मागितल्यावरून कोणी एक गरीब पति तिची समजूत करतो ]

" There is a garden in her face
Where roses and white lilies grow. "

T. Campion.

रंग केतकी देहीं विलसे, लुसलुसतें यौवन;
बघोनी मन जाई मोहुन !
देहयष्टि ती नाजुक भारी शोभे लतिकेपरी;
टवटवी ओथंबे तिजवरी !
भुज गोंडस ते पल्लव गमती, अंगुलिकांच्या वरी
शोभती नखपुष्पें सुंदरी !
हंसरे डोळे, विशाल, काळे गोकर्णीच्या सम
राजसे मोहविती हृन्मम !
चंपककलिका गमे नासिका; सरळ किती सुंदर !
बघें मी सोत्सुक वरचेवर !
अधरोष्ठांची लाल मनोहर जोडी खुलते कशी !
प्रवालां मग तूं कां इच्छिसी !

कपोलभागीं फुलती सखये, गुलाब ते उत्तम !
कशा मग सोन्याचें कुत्रिम ?
दंतांचे ते सर मोत्यांचे विधिनें तुज ना दिले ?
कशा मग लागे नथ मंगले !
पुष्पें, रत्नें विधिनें सगळीं त्वद्देहीं माडिलीं !
भूषणें दिसतिल का मग भलीं ?
शोभसि किति तूं, मीच जाणतों ! मूर्तिमती चारुता
मला गे, दिसशी तू तत्त्वतां !
नकोत सखये ! खरेंच तुजशी सुवर्ण, मौक्तिक, मणी
स्वतांला पहा तरी दर्पणीं !

पुणें, १९२२ } प्रसिद्धीचें स्थळ New Poona College Magazine

---

## जुलमी जीवास जबाब.

[ दैवानें दिलेल्या उच्चतेनें शेफारून जाऊन एकजण आपल्या अन्यायाचें जोरजोरानें समर्थन करूं लागला, त्यास उद्देशून ]

( मणिमध्य वृत्ताचे चालीवर )

पिळवटुनी मम हृदयाला
लाभ काय तुजशीं झाला ?
हृदया पडली अढी अतां,
पीळ निघेल न तो पुरता !
मृदु हृदया आली घनता
आटुनि गेली स्नेहलता.
कठोरता येइल दिसुनी
मम आतां तुज दिनरजनीं

विसर, विसर मत्प्रेमाला
घालिन घोर तुला घाला !
व्यर्थ दुखविलें तूं हृदया
भोग फळें आतां अदया
मृदुल हृदय मम बघोनियां
सजलासी मज नाशाया
मृदुल, परी वज्रासम तें
योग्य समयिं रे बघ बनतें !
प्रभाव येइल तुज दिसुनी
उघड, उघड तूं नेत्र झणीं
सुमंगला मृदु जरि आम्हीं,
अमंगला निष्ठुर आम्हीं !
सुमंगलातें रक्षाया
अमंगलातें नाशाया
मद्देहा देईन बळी
पर्वा मजला मम न मुळीं !
जगताचें सुख काय मशीं ?
आहे त्याचा लोभ तुशीं
काय घालिसी भीति मला ?
पर्वा त्याची मुळिं न मला !
मरणाची भीती न जिथें,
दुःखाचें मग काय तिथें !
सुरासुरांचें द्वंद्व झणीं
खेळू, ये तूं रणांगणीं !
कोण बघूं या जिंकील
सत्याचा जय होईल !

पुणें,
डिसेंबर १९२२

## गगन–बोध

( वसंततिलका )

चंडांशुची प्रखर दीप्ति कधीं विराजे,
ज्योत्स्नाहि शीतल कधीं गगनांत साजे;
काळेकभिन्न फिरती कधिं मेघ दाट;
तो धूमकेतुहि तिथें करि आडवाट !
ती कृष्ण, भीषण निशा कधिं नाचते ही,
त्याची नभा परि गमे क्षिति ती न कांहीं
स्थित्यंतरें किति तरी घडती तयांत,
त्याचें परी हृदय फार विशाल, शांत !
कां सोडिशी मग नरा हृदयस्थ शांति,
स्थित्यंतरें जधिं करी भवितव्यता ती ?
ये प्राक्तनें तुज जधीं कुदशा जगांत
तू सोस ती धृति बहू धरुनी मनात

रायचूर, जानेवारी १९२३ } प्रसिद्धीचें स्थळ अरुणोदयमाला, औरंगाबाद.

## प्रभु–सपर्या.

( शार्दूल विक्रीडित )

[ आवाहन ]

दुःखाच्या अनलें कढावर किती येती मनीं ते कढ,
या योगें मम आर्त जीव करितो नांवें तुझ्या ओरड !
ये ना तूं झणिं ! अंत रे प्रभुवरा, माझा किती पाहसी ?
आशा भंग करूं नको च असली माझी विनंती तुशीं.

संसारीं मज कोणतीहि नुरली आशा जगन्नायका
आतां ती तव आस एकचि मशीं भक्तांचिया रक्षका !
तूं येशील म्हणोनि जीव मम हा आशेवरी टांगला—
केव्हांचा, परि तूं सख्या, अजुनि ही नाहींस रे पातला.
आतां कोमल अंतरांतुनि विभो, वैराग्य येई वरी !
अश्रूंचा द्रवरूप वेश धरूनी दाटे च नेत्रांतरीं !

[ पूजन ]

अश्रू हे मम नेत्रशुक्ति मधुनी मुक्तावलींच्या सम
गोविंदा ! गळती त्वदंघ्रिकमलीं; तू तोषवी हृन्मम !
अश्रूंचा अभिषेक मी करितसें त्वत्पादपद्मावरी,
मच्चिज्ज्योति तुझ्या वरूनि सखया ओंवाळितों श्रीहरी !
अर्पी मी कविता–सुधा तुजसि रे, स्वीकारिं नैवेद्य हा,
काव्याचीं कुसुमें तुला प्रभुवरा अर्पीतसें मी पहा !

रायचूर }
१९२३ }

प्रसिद्धीचें स्थळ—
सहविचार

## सदाफूल

( उपजाति )

जाई, जुई, चंपक, मोगरा तो,
शेवंतिचें फूल, गुलाब ही तो,
जेथें फुले, तेथ सुगंध खेळे
तया बघोनी रमतात डोळे !
तीं श्वेत, तीं पीत–तऱ्हेतऱ्हेचीं
पुष्पें किती हो डुलतात साचीं !

मृदुत्व भारी असतं तयाना,
क्षीणत्व येतें क्षणिं हो तयांना.
तीं आतपानें सुकतात सारीं
मनुष्य त्यांतें जपतात भारी!
सन्मान त्यांचा करिती किती ते
गुणामुळें मोल तयास येतें
सदाफुलातें न सुगंध कांहीं;
स्वरूप त्या तेंवि मुळींच नाहीं!
साऱ्या गुणांचाच अभाव जेथें,
विचारितो कोण तयास तेथें!
सदाफुला रूप सुगंध नाहीं
प्रेमें तरीही प्रभु त्यास पाही!
सदाफुलें तीं जुइच्या समान;
ईशा दिसे भेदचि तो मुळीं न!
हे भेद सारे जगिं मानवांचे
देवा घरीं ते वसती न साचे!
सर्वां ठिकाणीं प्रभुला समत्व
कोणाहि तो जास्त न दे महत्त्व!

\+ + + + +

सदाफुलाच्या सम काव्य माझें
सुगंध ना त्या; फुलण्यास लाजें!
ईशा! तरी त्वत्पदिं वाहताहें;
तेणें तया सार्थक लाभताहे!

रायचूर
जानेवारी १९२३

# एकाकी निर्झरिणी.

( वसंततिलका )

सह्याद्रिच्या वरुनि निर्झरिणी निघाली,
खालीं हळूं उतरुनी मुरडोनि आली.
खोऱ्यादऱ्यांतुनि बहू ठुमकोनि चाले,
तीच्या जला बघुनियां मम चित्त धालें !
हर्षें अती पुढतिं धांवत चालली ती,
मार्गामधें खडक ते तिज आड येती,
घेऊनियां झडकरी वळसे तयाना
मार्ग क्रमे पुढतिं गाउनि गोड गाना.
ती चालली पथिं जुमानुनियां न कांहीं,
तल्लीनची स्वपथ आक्रमण्यांत होई !
भेटावयास अति उत्सुक सागराला
झाली खरीच गमतें मज सह्यबाला !

\+ \+ \+ \+ \+

तों एक निर्झर तिथें तिकडोनि आला
तीच्या सवें रमतची पथ चालण्याला,
" दोघें क्रमूं मिळुनियां पथ आपुला गे !
ये हासुनी रमत सागरिं जाउं वेगें "
ओढ्याचिया परिसुनी असल्या बचाला
ती मानिनी क्रुधित हो म्हणिं सह्यबाला.
धिक्कारुनी कटुवचें तधिं निर्झरातें
वेगें क्रमे पुढतिं निर्झरिणी पथातें.
"कोणी मला मिळुं नये, नच मीहि कोणा
मार्गीं मिळेन, परिसा मम हाच बाणा ! "

गर्वे असें वदुनि धांवत एकटी ती
चाले पुढें, तिज कुणी मिळुनी न जाती.
तीही कुणा न कधिही पुढतीं मिळाली,
याकारणें तिजसि विस्तृतता न आली.

\+ + + + +

तों वालुकामय पुढें पथ रुक्ष आला-
आला तिच्यावरि खरा अति घोर घाला !
क्षीणत्व तीस सिकतेमधिं फार आलें,
वाहूं बघे, परि मुळी नच नेट चाले !
सारे तिचे विफलची मग यत्न होती,
हा, हाय ! तेथचि लया झणिं पावली ती !
" रत्नाकरा प्रति मिळूं, " असली सदाशा
वाटे पदोपदिंच निर्झरिणीस खाशा,
त्या वाळुनें तिज परी गिळिलेंच पार.

\+ + + + +

होता पुढेंच अजुनी किति अब्धि दूर !

रायचूर, जानेवारी १९२३. } प्रसिद्धीचें स्थळ:— New Poona College Magazine.

---

## चंद्र–कान्ता.

( पौर्णिमेचा चद्र झाडाआडून उगवत आहे. ' तो ' आपल्या लहानग्यास वराच्या अंगणात खेळवीत आहे. )

( मणिमध्यवृत्ताचे चालीवर )

' तो ':– वृक्षाच्या पट्टलामधुनी
कोण बघतसें तें लपुनी ?

वर्तुल मुख रम्याकृतिचें
बाळा, वद तें कवणाचें !
रौप्य-रसासम चकचकतें
वदन कुणाचें सुरम्य तें ?
नेत्रकटाक्षा फेंकोनी
कोण हांसतें नभांतुनी ?
शितल किरणें हास्याचीं
कोण उधळितें तीं साचीं ?
सुधारसानें न्हाणोनी
कोण खुलवितें ही अवनी ?
वृक्षपटाला दुरि करुनी
कोण येतसें नभोंऽगणीं ?
दिवसाचा दाहक ताप
कुणी हरविला तो साफ ?
नभीं चांदण्या इवल्याशा
हिरमुसुनी जाती कैशा ?
धवल वस्त्र ल्याली रजनी
सांग कुणाची ही करणी !
मोद पसरला चोंहिकडे
कुणामुळें तो, सांग गडे !

(इतक्यांत घरामधून 'ती' अंगणांत हळू हळूं प्रवेश करते. 'तिला' पाहून.)

'तो':— सदनाच्या द्वारा मधुनी
कोण बघतसें तें लपुनी ?
वर्तुल मुख रम्याकृतिचें
बाळा, वद तें कवणाचें !
गौर केतकी सम खुलतें
वदन कुणाचें सुरम्य तें ?

नेत्रकटाक्षा फेंकोनी
कोण हांसतें तेथोनी ?
शीतल किरणें हास्याचीं
कोण उधळितें तीं साचीं ?
सुधारसानें न्हाणोनी
कोण आणितें भा सदनीं ?
गृहद्वार तें लोटोनी
कोण येतसे गृहांगणीं ?
दिवसाचा दाहक ताप
कुणी हरविला तो साफ ?
मनिंच्या चिन्ता इवल्याशा
होउनि जाती त्या कैशा ?
धवल वस्त्र ल्याली रमणी,
सांग कुणाची ही राणी !
मोद पसरला चौंहिकडे
कुणामुळें तो, सांग गडे !

पोचारम } प्रसिद्धीचें स्थळ.
१९२३ } सहविचार

---

## कमल¹केलि.

( द्रुतविलंबित )

सुखभरें बसुनी जननी–कटीं
' कमल ' केलि करी किति गोमटी !

---

१ कमला नांवाची कवीची कन्या आहे.

गलगलां वच कांहिंच बोलते;
बुध हि ना मुळिं जाणति बोल ते !
मृदु–मधु–स्मित ती करिते किती !
छवि कपोलिं तिच्या खुलते अती.
उडविते पदरा वरचेवरी
जननि त्यास सदा जरि सावरी.
जधिं तिला बहु पीडितसे क्षुधा
उगि बसेल कशी तधिं, हें वदा.
लगबगा बिलगे जननि–स्तनीं ।
पय पिई अति मोदुनिया मनीं !
टकमकां बघते जननी–मुखा;
जणुं तिला वदते, " मम घे मुका ! "
अमित घे जननी जधिं चुंबनें,
कमल हासतसे तधिं सन्मनें.
कुरळ, कृष्ण तिचे कच शोभती
अति सुकोमल त्या वदना प्रती.
नयन नील तिचे रुचिराकृति
बघुनि मोह पडे मतिला अति !
वरिवरी उडवी भुज सारिखें
सतत त्या बघतों अति कौतुकें.
वळवुनी मुठिंना वरि फेंकते,
मृदल कोमल नाचवि पाद ते
घडि घडी उपडी वळुनी, कुडी—
शिणविते अपुली कशि बापुडी !
कमल पाहतसे सरण्या पुढें,
परि न तें तिज ये, म्हणुनी रडे.

बहुत घेउनि छंदाचि खेळते
जननिचें रमवी अति चित्त तें
उसळुनी कशि आपुलिया मतें
कमल अंकिं तिच्या बहु डोलते !

हैद्राबाद दक्षिण. }
ता. १२।७।२३ }

---

## हरिस्तवनाष्टक.

" अधरं मधुरं वदनं मधुरम् ।
नयनं मधुरं हसितं मधुरम् ॥ "

श्रीवल्लभाचार्य

( पृथ्वी वृत्त. )

नितांत रुचिराकृती तव सुकोमला पाहुनी
मदीय मन माधवा, अमित जाय तें मोहुनी !
सुरम्य अति शोभतो मुकुट गोजिऱ्या मस्तकीं,
सुनील कच-भार तो विखुरला तयांतून कीं !
तुझी वलित कंधरा कितितरी दिसे सुंदरा;
तडित्समचि भासती मकरकुंडलें श्रीधरा !
त्रिनाम अति शोभतें तव विशाल भालीं हरे !
स्वरूप तव सांवळें बघुनि सर्व चिन्ता हरे.

मला सुखवितीं तुझ्या भ्रुकुटि त्या धनुष्याकृति;
सतेज सखया, तुझे कमल नेत्र ते शोभती !
वसे अधरिं रक्तिमा रुचिर पक्व बिंबासम;
खुले छवि कशी तुझ्या वदनिं चंद्रबिंबासम !

तुझी सरळ नासिका मज गमे हि चाफेकळी;
तुझी अमित गोमटी हनुवटी किती कोंवळी!
करांत मुरली तुझी विलसते कशी माधवा,
मधुस्वन तिच्यातुनी सतत काढ रे यादवा!

मधुस्वनसुधा तुझ्या रुचिर सान वेणूंतली
सदैव बघ सेवण्या मज हरे, तृषा लागली!
तृषार्त अति होउनी तळमळें, जसा मीन, मी,
मदीय लघु याचना सफल तू करी, मी नमीं!

तुझें अतुल गोजिरें मृदुल-कुंद-दंतांतलें
मधुस्मित मशीं मिळो सतत पाहण्यातें भलें!
मदीय नयनांस ही बहुत आस लागे हरे,
प्रभो, पुरव तू, करी मम मनीं तुझें गेह रे!

तुझ्या स्तवाचि राधिका अखिल भान दे सोडुनी,
त्वदंघ्रिकमलीं मम स्थिति तशी बनो उन्मनी!
तुझ्या सुगुणगायनीं मम विलोल ती वैखरी
रमो स्थिर रमापते! सफलता तिची ही खरी!

प्रभो, मुळिं न आकळे मज तुझी निराकारता,
अतर्क्य मम बुद्धिला तशि तुझी गुणातीतता!
तरी तुजसि कल्पुनी सगुणता तुझें चिंतन
निरंतर करीं; तसें करितसें यशोगायन!

हैद्राबाद दक्षिण } प्रसिद्धीचें स्थळ
मे, १९२३ } स्वधर्म साप्ताहिक, पुणें.

## नाम—महिमा.

( अनुष्टुप् )

जगतीं संकटें येतां । जिव्हा नामरसीं रमे
रामनाम मुखीं येता । तोकडें विश्व हें गमें !
रामनामप्रभावानें । ऐकूं ये दिव्य गायन
रामनामसुधा पिता । होतसें मन उन्मन
रामनामरसा पीतां । धी धरी धृतिचें बळ
रामनामसुधा नाशी । मनिंचा मळ ओंगळ
रामनाम सुधारंगीं । रंगुनी चिर मोद ये
दैन्य, दुःखा नुरे ठावा । अखिलीं भा दिसून ये
रामनामसुधा पीतां । भी नुरे कलिकालिं ही
दिव्य ये नयनां दृष्टि । जी करी विश्व—भेद ही !
रामनामसुधा प्या हो । लागे मोल न त्या मुळीं
केधवां हि न या लोकीं । त्रासवील तुम्हां कली !

हैद्राबाद दक्षिण.
२।१०।२३

---

## सुविचार.

( द्रुतविलंबित )

धनुवरी शर तो स्थित जोंवरी
मनिं करा सुविचार चि तोंवरी
शर करामधुनी सुटतो यदा
परतुनी नच ये मुळिं हो तदा
कुवच तो रसनेवरि खेळतो,
मनिं करा तंवरी सुविचार तो.

कुवच तो रसना वदने यदा,
मग मुळीं अनुतापिं न फायदा.
घडि असे तुमच्या करिं जोंवरी,
मनिं करा सुविचार चि तोंवरी !
घडि निघोनिच जाइल जेधवां,
हृदयिं वेदन होइल तेधवां.
सुखद सज्जन हो ! सुविचार तो—
मनिं सदाच करा; तधिं दिव्य तो—
जगतिं मोद तुम्हां कळुनीच ये.
अनुभवा न तुम्हां मुळिं दैन्य ये.

हैद्राबाद दक्षिण }
ता. २।१०।२३ }

## उन्मनस्कालाप.

( अति झालें म्हणजे हसू येतें; या न्यायानें आयुष्यांत पराकाष्ठेची निराशा झाली म्हणजे वृत्तींत एक प्रकारची बेफिकिरी फकिरी येते व मनोभूमींत निवृत्तीचें बीज चांगलें वाढीस लागून अर्ती श्रेयाच्या दृष्टीनें हितच होतें. मात्र, हृदय जागृत असलें पाहिजे ) .

( साकी. )

कोमल हृदया कठोर जगतीं मुळिंच नसे आधार
हाल तयाचे कितीक होती हाय ! तयां ना पार !
जग मायावी, क्षणांत त्याचे पालटती ते रंग
आंत एक बाहेरहि दुसरें असें तयाचें अंग.
मृदु हृदयातें जिकडे तिकडे होती कष्ट अपार
कंदुकसम त्या जो तो तुडवी, किती स्थिती लाचार !

+ + + + +

नवरंगाच्या नटव्या जगता बघुनी नेत्रांवरची
झांपड गेली साफ उडोनी, दृष्टी फिरली साची !
मन्मृदुमानस विटुनी गेलें, जग दिसतें भेसूर
प्रेमाचे ही बंध गळाले, गेलों जगता पार !
आभासाचा पुरा लागला मद्दृष्टीला अंत.
सुखदुःखाची आतां मजला कशास राही खंत !
नैराश्याचें खत घालोनी मानसभूमी वरतीं ।
निवृत्तीचें बीज पेरिलें, सुंदर अंकुर फुटती !
स्वार्थाच्या हुरहुरिचा गेला मनिंचा दाहक ताप;
हिरवळ फुटुनी शीतल झालें सर्वचि आपोआप !

\+ + + + +

स्वार्थाचें तें बंधन तुटलें; आत्मा झाला स्वैर
साम्राज्याचा प्रसार झाला दिक्कालाच्या पार !
मी, तू नुरलें ! द्वंद्व हि सरलें ! झालें गोलंकार
चैतन्याच्या आनंदाचा दाटुनि गेला पूर !

निजामसागर,
माहे २।१९२४

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 3037

## मोदेषणा.

" Spirit of Delight!
Wherefore hast thou left me now
Many a day and night ? "

SHELLEY.

( चालः— चंद्रकांत राजाची )

आनंदाच्या सुधारसास्तव बावरला जीव;
मोद-सुधा प्राशाची संतत हीच मशीं हाव !

दुःखाच्या आतपात झाला जीव अति क्लांत,
मोदासाठीं तृषा लागली, झालों मी श्रांत!
रुक्ष जाहली मानसभूमी, धृतिच्या, आशेच्या
सुलता साऱ्या सुकुनी गेल्या—यशोलता साच्या.
आनंदाच्या वृष्टीसाठीं दृष्टी गगनात
लावियली मी, परंतु मजशीं न पावशी नाथ!
मोदरसाविण तनू जाहली शुष्क अती माझी,
उत्साहाचा अंश न उरला! ऐशी इतराजी-
देवा कथ रे कशास केली? वत्स तुझें सान-
आक्रंदुनिया विनती करितें, दे तिजला मान!

निजामसागर,
मार्च १९२४.

---

## आहे सर्व खरें, परंतु—

( शार्दूलविक्रीडित )

रामा सद्गुणशालिनी, अमित ती नेत्रांस आल्हादिनी!
आहे ती मधुभाषिणी, गजगती तीची मनोहारिणी!
काया गौर नितांत, यौवनभरें उत्फुल्ल गात्रें किती
तत्सौंदर्य तुलावयास जगतीं वस्तू नसे कोणती!
काळेभोर विशाल नेत्र खुलती, रेखीव त्या भ्रूलता,
तीचे ते अधरोष्ठ लाल असती बिंबाहुनी तत्वता,
मोत्यांचे सर कीं जणूं विलसती—ती शुभ्र दंतावली,
चिंचोळी हनु कोंवळी तिजवरी ती गोजिरीशी खळी!
आहे ती नृपनंदिनी, निशिदिनीं श्री खेळते अंगणीं
सारे सज्जित भोग तेथ असती तीच्या मनोरंजनीं

श्री ... ग्रंथालय

आहे सर्व खरें, परंतु नयनीं उद्विग्नता संचरे!
हास्याची लहरी कधींहि न तिच्या गालांवरी वावरे!
नाना सौख्यविलासभोग असती बाह्यीं, परी अंतरीं—
दुःखाचा अनिवार डोंब उठला, निर्विण्ण तीतें करी !
कां उद्विग्न बरें ललाम ललना रात्रंदिनीं ही असे ?
हा, हा ! कुंकमहीन दीन सितता तीच्या ललाटीं वसे !

निजामसागर, }
जून १९२४ }

प्रसिद्धीचें स्थळ—
काव्यरत्नावली.

---

## बापूंची खानावळ.

( कविता वाचून वाचकांनी कृपा करून माझ्या विरुद्ध बापूचे कान भरू नयेत. कारण, तसें केल्यास खाल्ल्या घरचे वांसे मोजण्याच्या अपराधाचें माप बापू माझ्या पदरीं घालतील ! )

( विद्युन्माला वृत्ताचे चालीवर )
" दहा वाजले बापू आतां;
उशीर नाहीं झाला म्हणतां !
शाळेची ती होइल घंटा
मास्तर घेतिल हातीं सोटा
अभ्यासाचा होइल तोटा;
सारे म्हणतिल मज मग गोटा
झटपट घाला अमुच्या पोटा
नाहीं तर हो होइल तंटा !
उशीर होतां घाई मोठी-
उडते, उठतों अर्ध्या पोटीं ! "

\+ \+ \+ \+ \+

“ जिकीर जोशी, फारच तुमची
खानावळ ही एक न अमुची !
पुण्यामध्यें या रस्तोरस्तीं
खानावळि हो कितितरि असती
तुम्हांस आहे वाट मोकळी
कशास करिता कटकट असली ! ”
कडक विडीचे झुरके घेउनि
बापू मालक वदती कोपुनि.
तोंच भोगले-बंधू आले,
परांजपे, वारे ही शिरले
‘ मेंबर ’ सारे झटपट जमले
बापुहि घाई करिते झाले

× × × ×

“ पांट मांड रे पटपट रामा !
उशीर कां तूं करिशी कामा ?
ताटें धुतलीं कां गंगीनें ?
मांड लौकरी जा ओळीनें !
गोप्या ! तांब्ये आण भरोनी ! ”
बापू मालक ऐसें वदुनी
वाढायातें अपल्या हातीं
भात, आमटी, चटणी घेती.
पानामध्यें उसळ वाढिती
भोजनास ‘ मेंबर ’ ही बसती.
‘ पोळीवाले ’ त्यांतचि आले
‘ भाकीचे ’ ही त्यांतचि बसले.

× × × ×

बुंदी मारिली तरिही कोणा
आमटींतला न मिळे दाणा !
घृतधारेचें वर्णन सगळें
" केशवसुत " कवि करिते झाले
भात लागतो नित्य बुडीला
मीठ न मुळिं तें कधिं भाजीला !
अर्धें कच्चें अन्न सदाही !
खानावळ ती असली राही
विद्यार्थीगण हाय, आमुचा
अर्ध्या पोटीं उठतो साचा
धन्य परी खानावळवाले;
पुण्यामधें हो गबरचि झाले !

× × × ×

हात पाय कोणीहि न धुतले,
सदऱ्यासह कित्येकचि बसले !
सात पुटींचा मुकटा मळका
ओकारी जो आणी लोकां
पिढीजात ठेवण बापूंची
सदा नेसते स्वारी त्यांची !
गलक्यामध्यें भोजन चालें
हास्यरसानें ' गृह ' दणाणलें !
' भाजी वाढा ' वदती कोणी;
' पाणी आणा ' म्हणती कोणी
संतत असली दंगल चाले
धन्य धन्य खानावळ-वाले !

× × × ×

ताज्या खबरा अष्ट दिशांच्या
कानीं पडती येथें साच्या !
वाङ्मयचर्चा संतत चाले,
राजकारणहि येथें उसळे !
व्यापरांतिल तेजी-मंदी
येथें येई वादविवादीं !
नाट्यकला, ती चित्रकला ही
येती साऱ्या ललितकला ही !
मानवतेचे अजब मासले
अवलोकनिं हो येती सगळे
धन्य धन्य ही भोजनसंस्था
अल्प लाभ परि तिचा गृहस्था* !

निजामसागर. } प्रसिद्धीचें स्थळ—
जून १९२४ } New Poona College Magazine.

---

## वर्षाकाल

( साकी वृत्त )

ग्रीष्माचा संताप संपुनी शीतल वर्षा आली
हिरव्या हिरव्या तृणमय वसना सृष्टीरमणी ल्याली.
तडाग, वापी, निर्झर सारे तुडुंब भरुनी गेले
पर्जन्यस्वागतार्थ दर्दुर गायन करिते झाले.
सरिता साऱ्या हर्षित झाल्या जलपूर्णा सुखदाई
शेतकऱ्यांची वदनें झालीं प्रफुल्ल तीं लवलाई !

---

* घरांत राहणारा. अर्थात् ज्यास आई, बहीण अथवा असेंच कोणी "दुसरें माणूस" असल्यामुळें खानावळींत कदाचितच जावें लागतें तो.

गोपालांनीं खेळ बदलले ग्रीष्मऋतूंतिल सगळे
गुरा वासुरा ददात नुरली तृणमय कुरणाचि झालें !
रविराजाचें राज्य संपुनी, कारकीर्द मेघाची
नभःप्रदेशीं आतां चाले नितांत शीतल साची.
तापद किरणें रविचीं नुरलीं, मेघाच्या जलधारा
वसुंधरेवर संतत गळती; तापहि हरिती सारा !
चंद्रराज निस्तेज जाहला, अभ्रपटाच्या आंत,
वदना दडवी, कीं मेघानें केली त्यावरि मात.
कृष्णरात्र ती भीषण झाली मेघनाद गंभीर !
त्यांताचि चपला चमकुनि नाचे नभिंची चंचल नार !
इंद्रधनूंतिल रंग मनोहर गगना कधिं खुलवीती
बालमनाला, थोर मनाही अपार सौख्यचि देती !

निजामसागर,
ता. ५।७।२४

---

## बालपण.

( जलधरमाला वृत्ताचे चालीवर )

बालपणींच्या अव्याज प्रीतीचीं-
वर्षें सरलीं अनुपम सुरम्य साचीं !
बालिशतेच्या केलिमधें किति रमलों;
लटक्या कोपें कधिं मी रुसलों, फुगलों !
अज्ञानाचीं, परि तीं सारल्याचीं-
वर्षें सरलीं झरझर निर्मलतेचीं !
बालपणींचें जग जरि विस्तृत नव्हतें,
नितांत सुंदर तरि ही तें मज होतें !
नाविन्याचें जग मज होतें तेव्हां

उत्सुकतेनें हृदय भरतसें जव्हां
रुखरुख तेव्हां मुळिं नव्हती चिंतेची !
मौज तधीं बहु केलि रसा लुटण्याची
भृंगासम मी सान जगीं संचरलों
अनेकदां सत्क्रीडासुमरस प्यालों !
गत बाल्याचें होतां मजला स्मरण,
खरेंच देवा, गोड वाटतें मरण !

निजाम सागर } प्रसिद्धीचें स्थळ.—
जुलई १९२४ } काव्यरत्नावली.

---

## शिवबांचे मावळे.

( वृत्त :—साकी )

अम्हीं मावळे, शेतकऱ्यांचा मूळ आमुचा पेशा,
शिवबासाठीं परी उचलिलें मुलुखगिरीच्या वेशा !
सह्यागिरीच्या खोऱ्यामधला वास आमुचा मूळ,
देशासाठीं रणबाजीचें परी लागलें खूळ !
पटकुर जाडनि तेथें आला मांडचोळणा तंग,
रणभूमीवरि शिवानष्ट ते करूं पुरे हो दंग
औत टाकुनी धारण केली हातीं भाला बर्ची
गोब्राम्हणपालनार्थ आम्हीं प्राणहि घालूं खर्ची !
बैलांची संगत ती सुटली, भीमथडी दिलदार
चंचल वारू अम्हां लागती-जणुं बिजली गुलजार !
असुड टाकुनी दिधले आम्हीं, पाणिदार समशेर
हातीं धरुनी बनलों आतां गडी बडे रणशूर !
तळहातांवर कणसें चोळुनि भूक अम्हीं शमवितां;

सह्यगिरीच्या आढ्यामधल्या जला प्राशुनी असतों!
हां, हा, म्हणतां मजल मारुनी वाऱ्यासम गिरि फिरतों.
खोरें, खोरें ठाऊक पुरतें यवनांना चकवीतों!
गरजा अमुच्या अगदिंच थोड्या, चपळाई शरिरांत
जेरिस आणूं गलेलठ्ठ ते यवन पुरे निमिषात!
शराब, माशुक लागे त्यांना, नलगे आम्हा कांहीं;
गाफिलगिरिचा करुनि फायदा प्रस्थापूं शिवशाही!
स्वप्राणांची मुळीं न पर्वा, आहुति रणयज्ञांत
बहुत खुशीनें करुनी त्याची जय मिळवूं लढण्यांत!
निमक खाउनी इमान राखूं! करुनी हो रणनाद
" हर, हर, हर, हर, महादेव! " हा अरिमनिं उरवूं याद!
गडामागुनी जिंकुनि गड ते फडकवुं भगवा झेंडा;
शिकस्त करुनी रणीं परतवूं रिपुसेनेचा लोंढा!
मायभूमिवरि सडे शिंपडूं रिपुरक्ताचे लाल.
म्लेंच्छजनांच्या हातीं होती हाय, तियेचे हाल!
गोमातांना हाय, वधोनी मस्तवाल, बहु खाष्ट
दिवसां ढवळ्या माता, भगिनी भ्रष्टविती ते नष्ट!
हाय! नोडगे बळजबरीनें बाटविती बहुतांना;
मर्दन त्याचें पुरें करुनिया सुखवूं हिंदुजनांना!
माय भवानी देवो सुयशा! तिचा बेल-भंडार
उचलुनि देखा शिवप्रभूतें दिधला अमुचा प्यार!
शिवरायाचे कलिजे आम्हीं, तोही अमुचा कलिजा,
लढूं तयास्तव, शतायु होवो अमुचा प्यारा राजा!
शिवरायानें शिंग फुंकुनी डोंगरचे सरदार
क्षणीं जमविले सर्व मावळे लढवय्ये रणशूर!
अम्हीं मावळे जरी भावडे, अम्हां लेखणी परकी

स्वदेश-यश, तें स्वधर्मयश ही पसरूं साऱ्या लोकीं !
एकदिलानें करुनी सगळे म्लेंच्छ नेस्तनाबूद
जन्मा येउनि शिवशाही ती करू पुरी आबाद !

निजामसागर, } प्रसिद्धीचें स्थळ—
जुलै, १९२४ } चित्रमयजगत्.

---

## गुणी बाळ.

( स्वनिल )

काहीं कारण होउनी मज बहू वैताग येई मनीं,
तेव्हां वाटतसें नकोच वसणें या कंटकांच्या जनीं
केव्हां जीवहि तो नको गमतसे, सारें दिसें ओंगळ
तों येई " कमला " हळू तिकडुनी, कांहीं वदे मंजुळ !
तंद्रा तत्क्षणिं भंगुनी लगबगां यें पूर्ण भानावरी
तीचे साखरबोल ऐकुनि झणीं वैताग मी आवरीं
आहे कंटकपूर्ण जीवित जरी, आहे गुणी बाळ ही
कांहीं काल गमें मशीं खचित हो स्वर्लोकशी ही मही !
स्त्रीजातिप्रति निर्मुनीच विधिनें धन्यत्व संपादिलें
स्वर्गीचें धरणीवरी सुखदसें सौंदर्य तें आणिलें
पुष्पांच्या उडुंना जशा प्रसविती त्या वल्लरी भूवरी
बाळांच्या उडुंना तशा प्रसविती या अंगना भूवरी !
माताश्रीदुहितासहोदरिसवें आयुष्य हें घालवूं
प्राणज्योतिस या सुखेन मग हो देवाज्ञया मालवूं !

निजामसागर } प्रसिद्धीचें स्थळ—
२६।७।२४ } सहविचार

## लाजाळूस—

( शिखरिणी वृत्त )

तुझ्या अंगाची गे, मृदुल मधुता ये न तुलतां
तुझ्या अंगालागीं वसन हिरवें दे रुचिरता !
जरी अंकीं तूझ्या मधुर सुमनें तीं न रमतीं,
तरी तूझ्या ठाईं खचित जडली गे ! मम रति
तुझी वृत्ती आहे बहु सरळ साधी सुलतिके;
तुझ्या भोळ्या भावा मुळिं न नखरा तो रुचुं शके !
तुझ्या शालिन्याची अमित महती मी कथुं किती
तुझ्या ठायीं बाई, बहुत रमते गे ! मम मति
तुझ्या अंगा थोडा जरि हि घडला स्पर्श परका,
क्षणार्धीं तू घेशी शरमुनि बहू गोड मुरका
त्रपा ऐशी नामी मुळिं न मज अन्यत्र दिसली
कला रम्या ऐशी कथ तुज कुणी गे, शिकविली ?
जगाच्या कल्याणीं, तनु सदुपयोगी न पडते,
अशी चिंता तूतें निशिदिनिं अगे, काय गिळते ?
तुझ्या वृत्तीमध्यें तरिच बहु संकोच वसतो ?
परस्पर्शें तूझ्या हृदयिं कसला भाव उठतो ?
कला संकोचाची तव उचलली गे ! युवतिंनीं
वसे त्यांच्या अंगीं अमित रमणीयत्व म्हणुनी !
नसे अंगीं तुझ्या अणुभर हि औद्धत्य लतिके
तुझे सारे बाई मज रमवितीं भाव हि मुके !
दिसे ईषत्स्पर्शें तव सुहृदयाविष्करण तें
लतांमध्यें तूझ्या हृदयिंच सखे, काव्य वसतें !

वये, संस्कारांचें ग्रहण किति तूं शीघ्र करिशी !
गुणीं ऐशा मातें खचित कवयित्रीच दिसशी !

निजामसागर, २७ जुलई १९२४ } प्रसिद्धीचें स्थळ—काव्यरत्नावली.

---

## आकृतांस—

( निर्यमक स्वनित )

स्वार्थाची अनिवार हौस सहजीं फेटाळुनी बैसतों
तेव्हां तो जन बापुडा म्हणतसे, “ कांहीं न यातें कळे ! ”
जा हो, जा ! जन हो, अकालिंच बनें ज्ञानेंच मी वृद्ध हा
दिक्कालांतुनि आरपार सगळें मी पाहतों सर्वदा
सारें ही गत आकळीन, असला विश्वास अभ्यंतरीं
सारें ही पुढचें कथीन बुधहो एकाच सूत्रांतरीं
ईर्ष्येचे मम बोल फोल नसती, जाणीव माझ्या मनीं
गेला अज्ञपणा मदीय सगळा निःसंग झालों जगीं !
मी इच्छीन जरी, क्षणांत जवळी येतील युष्मद् सुखें
वाटे सौख्य तुम्हासि जें, मज गमे आभास त्याचा पुरा
यासाठीं मज लौकिकांत न दिसे थोडेंहि कोठें सुख
माझा प्रांत तुम्हांस गोचर कधीं होणार नाहीं मुळीं
खेळा हो जन ! बाहुल्या बहु दिल्या ईशें तुम्हां खेळण्या
मातें खेळ नको मुळींच तुमचा, माझा असे वेगळा !

निजामसागर, ता. ३०।७।२४. } प्रसिद्धीचें स्थळ—काव्यरत्नावली.

---

## भवार्णव

जरि नसे तितिक्षा तुझ्या मानसीं जरा,
तरि खुशाल जा तूं रसातळाला नरा !
हळहळून होतें व्यर्थ काय मानवा
चल ! हात मार तूं संसृतिच्या अर्णवा
कल्लोळ कपालीं कधीं कधीं बसतील,
कचुं नको तरी ही पैल तीर येईल !
धृति धरीं मनीं तूं परंधाम लाभेल
भवसागर सारा क्षणातही संपेल !
संसृतींत तुजशीं नाना स्थिति येतील,
संसृतींत तुजशीं नाना जन मिळतील
ढळुं देउं नको तूं परी तुझ्या सत्त्वाला
सुख, वैभव जगतीं भंगुर बुद्बुदमाला
गजबजाट संतत चालूं दे जगताचा
परि नको खुंटवूं मार्ग भवा तरण्याचा !

निजामसागर,
ता. १९।२।२५

---

## कवींचें स्तोम कां ?

( उन्हाशिवाय सावलीची किंमत कळत नाहीं. व्यवहारांत रुक्षता आहे, म्हणूनच कवींनाही मान आहे )

( वृत्त.—साकी. )

हाल अपेष्टांवांचुनि नाहीं मोल सुखाला लोकीं !
गरिबी पुढतीं श्रीमंतीला मान असे, अवलोकीं

उष्णकालिची रुखरुख नसता शीता कोण विचारी !
रोग घातकी असती, म्हणुनी आरोग्याची थोरी
दुष्ट दुर्गुणी जनाकारणें महिमा सौजन्याचा
कुरूपता संचरते म्हणुनी तोरा सौंदर्याचा !
धत्तूराच्या पुढें आवडे पुष्प चमेली सान
कर्कशरव केकीचा, म्हणुनी कोकिळ मिळवी मान !
व्यवहाराच्या रुक्ष जीवनीं कठोरता अनिवार;
कविहृदयाच्या सुमार्दवाचें स्तोम तरिच हो फार !

निजामसागर,
ता. २४।७।२५

## दुर्दैवी हिंदभू !

( गझल )

स्वातंत्र्यहीन झाली ही माय हिंदभूमी
झालों मलूल सारे आम्हीं पुरे निकामी !
स्वायत्तता कुठें हो गेली अतां सुखाची
ही वेळ आज आली पंकात लोळण्याची !
अज्ञान कोंदलेलें माजे दुहीं विषारी
लाचार आज झाली ही हिंदभू बिचारी !
खाया मिळे न कोणा फिरती भणंग भारी
पूर्वीं सुवर्णभूमी, वैराण आज सारी !
धंदे, कला बुडाल्या, दैवी परंपराही
क्लीबत्व ये अम्हांतें, तैशी वराकता ही !
वीरत्व पार गेलें, ये भीरुता अम्हाशीं

चारित्र्य चोख नाहीं, शैथिल्य ये विलासी
धर्मीं कुणा शिराणी ! देशास कोण मानी !
जाती अनेक झाल्या, चाले न वेदवाणी !
कोठें समर्थवाणी ? कोठें शहा शिवाजी ?
कोठें असे धनाजी ? कोठें सुवीर बाजी ?
शिंदे महादजी तो कोठें ? कुठें ' भरारी ' ?
विश्वास वत्स कोठें ? सेना कुठें करारी ?
दास्यीं महत्त्व गेलें, दास्यांत दैन्य आलें,
आले कुतर्क नाना, दास्यांत शौर्य मेलें !
बेड्या बड्या रुपेरी बांधोनिया पदांला
राजेच मानतों हो आम्हीं सदा स्वतांला !
रंगीत रेशमाच्या मृदु बंधिं बद्ध झालों,
हा हा ! परोत्कर्षाच्या मायें फसोनि गेलों !
गरजा अनेक झाल्या, जगणें परावलंबी
सर्वत्र दैन्य भासें, सारें परावलंबी !
कोते विचार झाले, कोत्याच कल्पना ही
हो कूपमंडुकांची वृत्ती बघोनि लाहीं !
आलस्य दाट, तैसें कार्पण्य घोर खेळें
मोहाचिया प्रभावें दृष्टीस मांद्य आलें !
जावी कशी स्थिती ही दास्यांत लोळण्याची !
होईल हिंदभू कां स्वायत्त पूर्ण साची !

निजामसागर
ता. १०।१२।२५.

## मर्मकथन.

( " काव्याकडे मनःप्रवृत्ति कशी वळली ? " असें कोणी एकानें विचारल्यावरून )

( अभंग )

करस्पर्श होतां । लाजाळू लाजे ती,
सुमें गंध देती । मोगरीचीं
आकाशीं भराऱ्या । मारितो गरूड,
गाई गान गोड । कोकिळा ती
नाचोनी मयूर । तोषवी नेत्रांसी
मधुर जिव्हेसी । इक्षुदंड
रजनीच्या पोटीं । तारे उगवती
सुमांची संतति । वल्लरींना
कस्तुरी संभवे । मृगाचिया नाभीं,
मुक्ता शुक्तिगर्भीं । जन्म पावे
इंद्रधनुमध्यें । रंगांचा संभव
विजेचा उद्भव । मेघामाजीं
पूर्णचंद्रामुळें । सागर हेलावे
किंवा द्रव पावे । चंद्रकांत
वर्तावें या मार्गें । कोण त्या शिकवी,
आम्हांस पढवी । काव्य तोचि !
काय सांगूं सुज्ञा । गावें कां आमुतें
मुळीं ना कळतें । केधवां ही
ईशें आम्हां दिला । काव्यमनोधर्म
जाण हें तूं मर्म । कवनाचें

शिकोनीच आला । उदरीं मातेच्या
गानें हा आमुचा । स्वभावचि !

निजामसागर,
ता. २८।४।२७

प्रसिद्धीचें स्थळः—
काव्यरत्नावली.

---

## कवि.

( चालः- भूपती सरें ते—अंतरा गाळून )

माधुर्य हुडकुनी चराचरांतिल सारें
शब्दांच्या रूपें मूर्त जगीं करणारे
भवपंथकंटकां मार्दव बहु देणारे
सौंदर्य, सत्यता अढळ—पदा नेणारे !
प्राकृतां भवीं या सत्पथ दाखविणारे
भारती—तनय हे कवींद्र असती सारे !
उगवत्या उषेच्या गालीं विलसे लाली
चंडत्व रवीचें तेजस्वी भूगोलीं !
ही अमितव्याप्ती गगनगर्भिंची गोल
ग्रहमाला जेथें नाच नाचती लोल !
कौमुदी—सुधाही शीतल सुखकर भारी,
ही मंगलमयता विश्वामधली सारी
या धरेवरिल ही विशाल भूधरमाला,
या पवित्र, शीतल साऱ्या सरिता—वाला
हा गभीर सागर अगाध ज्याची खोली,
हा अखिल पक्षिगण मंजुळ ज्याची बोली !
हीं सृष्टिसतीचीं सारीं सुंदर लेणीं

लीलेनें वर्णी कविची मंजुळवाणी !
त्या भावभावना शृंगारादि रसाच्या
कवि चित्रित करिती शब्दरंजनीं साच्या !

निजामसागर
ता १४।६।२६

## विरहगीत !

( चाल—भूपली खरे ते—अंतरा गाळून )

प्रेमाच्या बंधीं हृदयें निगडित झालीं,
तीं विलग कशीं गे राहतील भूगोलीं !
सगतीं जेधवां नसे जिवाची राणी,
कोटरीं तळमळे पक्षी केंविलवाणी
गातसे उदासी गाणें विरहीं मग्न;
कधिं चैन पडेना शांति तयाची भग्न !
हुरहूर तशी या जीवाच्या पक्षाला
मद्देहपंजरीं व्याकुळ अतिशय झाला !
दाहती तनूला ज्वाला विरहाग्नीच्या
मी मुकलों सुखकर तव सहवासा साच्या !

निजामसागर
ता. ८।१।२६

३५३०

RFFBK-0003734